K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.Com (code 243)

Subject:- Business Economics (Macro)

व्यावसायिक अर्थशास्त्र (स्थूल)Sem IV

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

घटक :- Unit No 4 सार्वजनिक आयव्यय

उपघटक :- सार्वजनिक आयव्यय : अर्थ आणि व्याख्या ,

व्याप्ती, महत्त्व

कर : अर्थ आणि प्रकार

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

Topic No 4

सार्वजनिक आयव्यय

PUBLIC FINANCE

4.1 सार्वजनिक आयव्यय : अर्थ आणि व्याख्या

(Public Finance : Meaning and Definitions)

4.2 सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती

(Scope of Public Finance)

4.3 सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्व

(Importance of Public Finance)

4.4 कर : अर्थ आणि प्रकार (Meaning and Types of Tax)

4.5 सार्वजनिक खर्च : अर्थ आणि वाढ होण्याची कारणे

(Public Expenditure : Meaning and Causes of Increasing Public Expenditure)

4.6 सार्वजनिक कर्ज : अर्थ आणि महत्त्व

(Public Debt: Meaning and Importance)

4.7 अंदाजपत्रक: अर्थ आणि प्रकार

(Budget: Meaning Types)

HRM BUS ECONOMICS SYBCOM

प्रास्ताविक

समग्रलक्षी अर्थशास्त्रात संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला जातो. अर्थव्यवस्थेच्या वाटचालीमध्ये सरकारच्या भूमिकेला विशेष महत्त्व असते. सरकारच्या कार्यव्यवहाराचा अभ्यास सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून केला जातो. सार्वजनिक आयव्यय म्हणजे सरकारचे उत्पन्न आणि सरकारचा खर्च होय. सार्वजनिक आयव्ययामध्ये सरकारच्या वित्त व्यवहारांचा अभ्यास केला जातो.

सार्वजनिक आयव्ययामध्ये सरकारचे उत्पन्न, उत्पन्नाचे मार्ग, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज, अंदाजपत्रकीय धोरण, आर्थिक धोरण आणि वित्तीय धोरण, वित्तीय संबंध इत्यादींचा अभ्यास केला जातो. सार्वजनिक आयव्ययातील विविध साधनांच्या माध्यमातून देशातील लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर अनुकूल परिणाम घडवून आणले जातात आणि प्रतिकूल परिणाम टाळले जातात.

प्रस्तुत प्रकरणात सार्वजनिक आयव्ययाचा अर्थ, व्याप्ती, महत्त्व, कर, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज आणि अंदाजपत्रक इत्यादी उपघटकांचे सखोल विवेचन केलेले आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

4.1 सार्वजनिक आयव्यय : अर्थ आणि व्याख्या

PUBLIC FINANCE: MEANING AND DEFINITIONS

सार्वजनिक आयव्यय अर्थ

सार्वजनिक आयव्यय हे एक राजकोषीय शास्त्र आहे. सार्वजनिक आयव्ययात सरकारच्या वित्तीय व्यवहारांचा अभ्यास केला जातो. 'सरकार' या संज्ञेत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचा अंतर्भाव होतो. सार्वजनिक आयव्ययात सरकारच्या उत्पन्नाचे वेगवेगळे मार्ग कोणते, मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग सरकार कोणकोणत्या बाबींवर खर्च करण्यासाठी करते याचा अभ्यास केला जातो.

थोडक्यात, सार्वजनिक आयव्ययात सरकारचे उत्पन्न आणि सरकारचा खर्च या विषयीचे विश्लेषण केले जाते.

सार्वजनिक आयव्ययात सार्वजनिक उत्पन्न, सार्वजनिक खर्च, सार्वजनिक कर्ज, तुटीचा अर्थभरणा इत्यादींचा समावेश केला जातो.

संकुचित अर्थ : संकुचित अर्थाने सार्वजनिक आयव्यय ही संकल्पना मांडताना सरकारच्या किंवा राज्याच्या उत्पन्न व खर्चाच्या स्वरूपाचा किंवा तत्त्वांचा विचार केलेला आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

- सार्वजनिक आयव्यय व्याख्या

- **"राज्याच्या उत्पन्न आणि खर्चाच्या स्वरूपाचा व तत्त्वांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सार्वजनिक आयव्यय होय."**

- **"सार्वजनिक सत्तेचे उत्पन्न मिळविणे आणि खर्च करण्याच्या पद्धतीशी संबंधित असणारे शास्त्र म्हणजे सार्वजनिक आयव्यय होय." - फिंडले सिरास**

सार्वजनिक आयव्यय व्यापक व्याख्या

जागतिक महामंदीनंतर सरकारच्या भूमिकेत आणि कार्यपद्धतीत बदल झाल्यामुळे सार्वजनिक आयव्ययाचे स्वरूप व व्याप्ती व्यापक झाली. त्यामुळे सार्वजनिक आयव्ययाच्या व्याख्यासुद्धा व्यापक झाल्या.

"सार्वजनिक आयव्यय हा विषय अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या दोन शास्त्रांच्या सीमारेषेवर असणाऱ्या अनेक विषयांपैकी एक विषय आहे. सार्वजनिक आयव्यय हे सार्वजनिक सत्तांच्या उत्पन्न व खर्चाशी आणि एक-दुसऱ्यांमधील समायोजनाशी संबंधित आहे." **- प्रा. युज डाल्टन**

वरील व्याख्येत सार्वजनिक आयव्ययाचा विचार करताना सरकारचे उत्पन्न व खर्च आणि उत्पन्न व खर्चाच्या समायोजनाचा विचार केलेला आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

- **"सार्वजनिक आयव्यय हे सार्वजनिक सत्तेचे उत्पन्न व खर्च, त्यांचा परस्परांशी असलेला संबंध तसेच वित्तीय प्रशासन आणि वित्तीय नियंत्रण यांचे अध्ययन करणारे शास्त्र होय.”** **- प्रा. सी. एफ. बॅस्टबल**

या व्याख्येत सार्वजनिक आयव्ययाचा संबंध सरकारच्या अर्थकारणाशी जोडलेला आहे.

- **“सरकारच्या उत्पन्न व खर्चपद्धतीभोवती समस्यांची जी गुंतागुंत निर्माण झालेली असते तिला सर्वसाधारणपणे सार्वजनिक आयव्यय असे म्हणतात."**

- आर. जी. मसग्रेव्ह

सार्वजनिक आयव्ययाची वैशिष्ट्ये :

(1) सार्वजनिक आयव्ययामध्ये सरकारच्या वित्तीय धोरणांचा अभ्यास केला जातो. -

(2) सार्वजनिक आयव्ययात सरकारचे उत्पन्न आणि सरकारचा खर्च या दोन मुख्य गोष्टी अभ्यासल्या जातात.

(3) सार्वजनिक आयव्ययात सरकारचे उत्पन्न आणि खर्च यामध्ये समायोजन कसे साधले जाते याचा अभ्यास केला जातो.

(4) सार्वजनिक आयव्ययामध्ये सार्वजनिक सत्तेचे उत्पन्न, स्वरूप व तत्त्वांचा अभ्यास केला जातो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(5) अलीकडच्या काळात सार्वजनिक आयव्ययामध्ये सार्वजनिक उत्पन्न व खर्च याबरोबर वित्तीय प्रशासन आणि वित्तीय नियंत्रण यांचाही अभ्यास केला जातो.

(6) सार्वजनिक आयव्यय हा विषय राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यातील एक दुवा आहे.

(7) सार्वजनिक आयव्ययामध्ये सरकारी उत्पन्न व खर्च यांच्या पद्धतीचे परीक्षण आणि मूल्यमापन केले जाते.

(8) सार्वजनिक आयव्ययात वित्तीय साधनांचा वापर कसा केला जातो याचा अभ्यास केला जातो.

4.2 सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती

SCOPE OF PUBLIC FINANCE

जागतिक महामंदीपूर्वी सार्वजनिक आयव्ययाकडे बघण्याचा दृष्टिकोन संकुचित होता. सरकारने कमीतकमी कर बसवावा, कमीतकमी खर्च करावा, कर्ज घेऊ नये या विचारसरणीमुळे सार्वजनिक आयव्ययाची व्याप्ती मर्यादित होती. जागतिक मंदी आणि दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक बहुतेक सर्व देशांनी कल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारली, सरकारने किती कर बसविले, किती खर्च केला, कर्ज काढले की नाही हे महत्त्वाचे नसून कर, खर्च आणि कर्जामुळे राष्ट्राच्या संपत्तीत वाढ होते का, उत्पन्नाच्या वाटणीत सुधारणा होते का, या बाबींना महत्त्व दिले गेले. त्यामुळे सार्वजनिक आयव्ययाची

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

व्याप्ती व्यापक झाली. सार्वजनिक आयव्ययाच्या व्याप्तीत अनेक नवीन अभ्यास-विषयांचा समावेश झाला.

1. सार्वजनिक उत्पन्न (Public Revenue) : सार्वजनिक उत्पन्न हा सार्वजनिक आयव्ययाचा मुख्य अभ्यास-विषय आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था कोणकोणत्या मार्गांनी उत्पन्न मिळवितात याचा अभ्यास सार्वजनिक उत्पन्नात केला जातो. सार्वजनिक उत्पन्न उभारणीचे दोन प्रमुख मार्ग आहेत :

(i) कर उत्पन्न : कर उत्पन्न हा सार्वजनिक उत्पन्न उभारणीचा सर्वांत महत्त्वाचा प्रमुख मार्ग आहे. कर उत्पन्नामध्ये प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश होतो.

(ii) करेतर उत्पन्न : करेतर उत्पन्नामध्ये अनुदाने, दंड, देणग्या, सार्वजनिक उपक्रमांचा नफा, सरकारी मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न यांचा समावेश होतो. करांचा अभ्यास करताना करांचे विविध प्रकार, कर रोपणाची तत्त्वे, करघात, करभार, कराचे उत्पादन, विभाजन, बचत, गुंतवणूक व रोजगारीवर होणारे परिणाम यांचा अभ्यास केला जातो. तसेच कर चुकवेगिरी, कर चुकवेगिरी आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजना, कर उत्पन्नात वाढ करण्यासाठी उपाययोजना अभ्यासल्या जातात.

2. सार्वजनिक खर्च (Public Expenditure) : कर व करतेर मार्गांनी मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग सरकार रस्ते, रेल्वे, वीज, पाणीपुरवठा, शाळा, दवाखाने इत्यादी

HRM.BUS.ECONOMICS SYBCOM

पायाभूत व आर्थिक सुविधा निर्माण करण्यासाठी करते. तसेच दारिद्र्यनिर्मूलन, बेकारी-निर्मूलन, अपंग, निराधार यांच्या कल्याणासाठीच्या विविध योजना राबविल्या जातात. सार्वजनिक खर्चाचे विकास खर्च व विकासेतर खर्च अशा दोन गटात वर्गीकरण केले जाते. आर्थिक नियोजन काळात आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी सरकारची कार्ये व जबाबदाऱ्यांमध्ये सतत वाढ होत आहे. सार्वजनिक खर्चाचा अभ्यास करताना सार्वजनिक खर्चातील निर्णायक बाबी, सार्वजनिक खर्चाची तत्त्वे, सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे, सार्वजनिक खर्चाचे उत्पादन विभाजन, गुंतवणूक व रोजगारीवर होणारे परिणाम अभ्यासले जातात.

3. सार्वजनिक कर्ज (Public Debt) : जेव्हा सार्वजनिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी कराच्या मार्गाने उभारलेला पैसा/उत्पन्न अपुरे पडते तेव्हा सरकार विकास योजना किंवा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारते.

सार्वजनिक कर्जाचे दोन प्रकार पडतात :

(i) अंतर्गत कर्ज : देशातील जनता, बँका व वित्तीय संस्थांकडून उभारलेले कर्ज.

(ii) बाह्य कर्ज/परकीय कर्ज : परदेशातील नागरिक, बँका, परदेशातील सरकारे व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वित्तीय संस्थांकडून (जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक उभारलेले कर्ज) कर्ज घेतले जाते,

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक कर्जाचा अभ्यास करताना सार्वजनिक कर्ज उभारण्याच्या द्रती, सार्वजनिक कर्ज उभारताना स्वीकारलेल्या अटी, व्याजदर, सार्वजनिक कर्ज परतफेडीच्या पद्धती, सार्वजनिक कर्जाचे अर्थव्यवस्थेवर होणारे अनुकूल परिणाम, सार्वजनिक कर्जउभारणीमुळे निर्माण होणाऱ्या समस्या इत्यादी बाबींचा अभ्यास सार्वजनिक आयव्ययात केला जातो.

सार्वजनिक कर्जाचे व्यवस्थापन, सार्वजनिक कर्जाचा सापळा आणि त्यातून मुक्त होण्याचे मार्ग यांचा अभ्यास सार्वजनिक कर्जामध्ये केला जातो.

4. वित्तीय प्रशासन (Financial Administration) : सार्वजनिक उत्पन्न आणि सार्वजनिक खर्च यांच्यामध्ये मेळ घालणारे साधन म्हणजे सरकारचे अंदाजपत्रक होय. दरवर्षी केंद्र सरकार फेब्रुवारी महिन्यात अंदाजपत्रक सादर करते. त्या अंदाजपत्रकात सरकार नवीन कोणते कर बसविणार, कराच्या दरात कोणते बदल करणार, कोणत्या कर सवलती देणार, कोणते कर रद्द करणार याबाबत तपशील असतो तर दुसऱ्या बाजूला गरीब जनतेच्या कल्याणासाठी कोणत्या योजना राबविणार याबाबतही तपशील असतो. तसेच सार्वजनिक कर्ज परतफेड करण्यासाठी कोणत्या मार्गाने उत्पन्न उभारणार याबाबत तपशील असतो. अल्पकालीन व दीर्घकालीन अंदाजपत्रकीय धोरणे, अंदाजपत्रकीय नीती सरकार स्पष्ट करते. वित्तीय प्रशासनामध्ये अंदाजपत्रकाचे विविध प्रकार, अंदाजपत्रकीय धोरणाचे आर्थिक विकासावरील परिणाम, गरीब व बेकारांसाठी केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास केला जातो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

5. वित्तीय धोरण (Fiscal Policy) : देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे, आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे, उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी करणे, मागास भागाच्या विकासाला चालना देणे, रोजगारनिर्मितीत वाढ करणे ही आर्थिक धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सरकार वित्तीय धोरण आखते. मागास भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी कर सवलती, अनुदाने व आर्थिक साहाय्य देते.

सरकारच्या वित्त व्यवहाराशी संबंधित धोरणाला 'वित्तीय धोरण' असे म्हणतात.

वित्तीय धोरणाची आवश्यकता, उद्दिष्टे, उद्दिष्टपूर्ततेसाठी ठरविलेली विविध धोरणे. वित्तीय धोरणांची अंमलबजावणी, विविध कालखंडातील वित्तीय धोरणाची फलश्रुती यांचा अभ्यास केला जातो.

जेव्हा देशात भाववाढीची परिस्थिती निर्माण होते तेव्हा सरकार करवाढीचे व करउभारणीचे, सार्वजनिक खर्च कपातीचे, सार्वजनिक कर्ज उभारणीचे धोरण स्वीकारते. जेव्हा देशात भावघटीची परिस्थिती असते तेव्हा सरकार कर कपातीचे, सार्वजनिक खर्च वाढीचे व सार्वजनिक कर्ज परतफेडीचे धोरण स्वीकारते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

6. वित्तीय संबंध (Financial Relations) : भारतात संघराज्यीय वितीय व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आलेला आहे. भारतात केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कार्ये निश्चित करण्यात आलेली आहे. केंद्र सरकारने कोणते कर बसवावेत, कोणत्या करातील हिस्सा राज्य सरकारला द्यावा, स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणते कर बसवावेत याविषयीची चर्चा वित्तीय संबंधात केली

जाते. भारतात दर पाच वर्षांनंतर केंद्र-राज्य यांच्यातील वित्तीय संबंध ठरविण्यासाठी अनुदाने आणि आर्थिक साहाय्याचे वाटप करण्यासाठी, करातील वाटा, लोकसंख्या, मागासलेपणाचे निकष विचारात घेऊन वित्तीय आयोग तरतुदी करतो.

संघीय वित्तीय व्यवस्थेत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अर्थविषयक संबंध, त्याची तत्त्वे, कर विभाजनाचे नियम, देव-घेवीचे व्यवहार, आर्थिक समायोजन इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो.

4.3 सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्व

IMPORTANCE OF PUBLIC FINANCE

विकसित आणि विकसनशील देशांमध्ये सामाजिक आणि आर्थिक दृष्टीने सार्वजनिक आयव्ययाला खूप महत्त्व असते. विकसित देशात किंमतस्थैर्य आणि पूर्ण रोजगार ही सार्वजनिक आयव्ययाची मुख्य आर्थिक ध्येये असतात. विकसनशील देशात भांडवलसंचय आणि पायाभूत सुविधांची निर्मिती करून जलद आर्थिक विकास साध्य करणे हे सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्वाचे ध्येय असते. उत्पन्नाचे सामाजिक समान वितरण, उत्पन्न विषमतेत घट करणे ही सार्वजनिक आयव्ययाच्या कार्यव्यवहाराची महत्त्वाची कार्ये असतात.

देशाच्या विकासासाठी सार्वजनिक आयव्ययाला विशेष महत्त्वाचे असते. सार्वजनिक आयव्ययामध्ये देशातील विविध नागरिकांच्या संघटनाच्या करआकारणी आणि खर्चाचा

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

अभ्यास केला जातो. सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी आर्थिक संसाधने उभारण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आयव्ययाला विशेष महत्त्व असते.

पुढील मुद्द्यांच्या आधारे सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्व स्पष्ट केले जाते.

1. आर्थिक वृद्धीचा स्थिर दर (Constant Economic Growth) : आर्थिक वृद्धीचा स्थिर दर साध्य करण्यासाठी सरकार कर, सार्वजनिक खर्च आणि सार्वजनिक कर्ज या वित्तीय साधनांचा वापर करते. या वित्तीय साधनांच्या माध्यमातून बाजारातील वस्तूंच्या एकूण मागणीत आणि एकूण पुरवठ्यात वाढ घडवून आणली जाते. कर सवलतीद्वारे उत्पादनवाढीला चालना दिली जाते. पायाभूत सुविधांची उभारणी सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून करून आर्थिक वृद्धीला पोषक वातावरण तयार केले जाते. सार्वजनिक कर्जाच्या

माध्यमातून उत्पादक प्रकल्पाची निर्मिती करून उत्पादन व रोजगारवाढीला चालना दिली जाते.

2. किंमत स्थैर्य (Price Stability) : सरकार सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून चलनवाढ आणि चलनघट नियंत्रित करते. चलनवाढीच्या काळात प्रत्यक्ष करामध्ये आणि भांडवली खर्चात वाढ केली जाते. सार्वजनिक कर्जाच्या माध्यमातून गुंतवणुकीसाठी निधी उभारला जातो. चलनघटीच्या काळात प्रत्यक्ष करामध्ये घट केली जाते. सार्वजनिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ करून सार्वजनिक कर्ज मुदतपूर्व परत दिले जाते. नवीन सार्वजनिक

HRM-BUS.ECONOMICSSYBCOM

कर्ज उभारले जात नाही. सार्वजनिक खर्चाद्वारे रोजगारनिर्मिती करून मागणीच्या पातळीत वाढ करून किंमतघटीला आळा घातला जातो.

3. आर्थिक स्थैर्य (Economic Stability) : अर्थव्यवस्थेला स्थैर्यता प्राप्त करण्यासाठी सरकार वित्तीय साधनांचा वापर करते. तेजीच्या काळात करआकारणीत वाढ केली जाते. देशांतर्गत सार्वजनिक कर्ज मोठ्या प्रमाणात उभारले जाते. कर्जाच्या मदतीने उभारलेल्या पैशाचा विनियोग परकीय कर्जाची परतफेड करण्यासाठी आणि विविध प्रकारच्या शोधांसाठी केला जातो. सार्वजनिक खर्चात कपातीचे धोरण स्वीकारले जाते. मंदीच्या काळात मंदीचे नियंत्रण करण्यासाठी कर कपात, सार्वजनिक कर्ज, मुदतपूर्व परतफेड आणि सार्वजनिक खर्चात वाढ करण्याचे धोरण स्वीकारले जाते. कर कपात व कर्जफेडीमुळे आणि सार्वजनिक खर्चवाढीमुळे जनतेच्या हातात जास्त पैसा येतो. जनतेच्या क्रयशक्तीत वाढ होऊन मागणीची पातळी वाढते.

4. उत्पन्नाचे समान वितरण (Equal Distribution) : उत्पन्न आणि संपत्तीच्या विषमतेत घट करण्यासाठी सरकार कर आणि खर्च या साधनांचा वापर करते. जेव्हा देशात विषमतेचे प्रमाण उच्च असते तेव्हा सरकार उत्पन्न, नफा आणि श्रीमंत लोकांची मालमत्ता आणि श्रीमंत लोक वापरत असलेल्या वस्तू यांवर जास्त कर आकारते. कराच्या माध्यमातून गोळा केलेल्या पैशाचा विनियोग गरीब लोकांच्या कल्याणासाठी केला जातो. गरीब वर्गाला आर्थिक साहाय्य, अनुदाने, भत्ते इत्यादी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मार्गाने लाभ प्राप्त करून दिले जातात. अंध, अपंग, वृद्ध, निराधार, विधवा स्त्रिया, सीमांत शेतकरी, दुर्बल घटकांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

5. संसाधनाचे योग्य वाटप (Proper Allocation of Resources) : नैसर्गिक, मानवनिर्मित आणि मानवी संसाधनाचा योग्य वापर करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आयव्ययाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. सरकार कर्ज आणि खर्च या साधनांचा वापर करून अनावश्यक किंवा कमी महत्त्वाच्या असणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनात कपात करते. अनावश्यक किंवा कमी महत्त्वाच्या वस्तूंच्या उत्पादनावर जादा दराने करआकारणी केली जाते. जनतेच्या हिताच्या आणि कल्याणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढविण्यासाठी करदरात सवलती देऊन आर्थिक साहाय्य दिले जाते. त्यामुळे अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडून आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाकडे साधनसामग्रीचे हस्तांतरण होते. अनावश्यक वस्तूंच्या उपभोगाला आळा बसतो. आवश्यक वस्तूंच्या उत्पादनवाढीला चालना मिळते.

HRM BUS ECONOMICS SYBCOM

6. समतोल विकास (Balance Development) : सरकार कर आणि खर्च या साधनांचा वापर करून शहरी भाग व ग्रामीण भाग, शेतीक्षेत्र आणि उद्योगक्षेत्र यांच्यामधील विकासाच्या संदर्भातील तफावत किंवा दरी कमी करते. सरकार अंदाजपत्रकीय धोरणाच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करते आणि ग्रामीण भागातील जनतेला प्रत्यक्षपणे आर्थिक फायदे उपलब्ध करून देते. शेतीक्षेत्राच्या विकासासाठी ग्रामीण भागात जलसिंचन, वीजपुरवठा, विपणन सुविधांच्या विकासावर भर देते. ग्रामीण भागात कृषीवर आधारित उद्योगाच्या विकासाला चालना देते.

7. निर्यातवाढीला चालना (Promotion of Export) : निर्यातवृद्धीला चालना देण्याच्या दृष्टीने निर्यातप्रधान वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगातील उत्पादित वस्तूंवर कमी प्रमाणात कर आकारले जातात. निर्यातक्षम उद्योगाच्या विकासाला चालना देण्यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. निर्यातक्षम उद्योगांना योग्य किमतीत आदानाचा पुरवठा व्हावा म्हणून अनुदानित किमतीची आदाने उपलब्ध करून दिली जातात. आयातीचे प्रमाण कमी करण्यासाठी आयात वस्तूंवर जादा दराने करआकारणी केली जाते.

8. पायाभूत सुविधांचा विकास (Infrastructural Development) : सरकार कराच्या माध्यमातून जे उत्पन्न गोळा करते त्या उत्पन्नाचा विनियोग पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी केला जातो. उदाहरणार्थ, रस्ते, रेल्वे, पाणीपुरवठा, वीज, वाहतूक व दळणवळण इत्यादी. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे देशात शांतता, न्याय आणि सुरक्षा प्रस्थापित होते. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, बँकिंग, विमा इत्यादी क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळते. त्यामुळे सामाजिक-आर्थिक सुधारणांना गती मिळते. पायाभूत सुविधा विकास आणि देशातील सर्व क्षेत्रांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कर व खर्च या वित्तीय साधनांचा वापर केला जातो.

9.**बचतीच्या आणि गुंतवणुकीच्या दरात वाढ करणे (To Increase the Rate of Saving and Investment) :** विकसनशील देशात उत्पन्नपातळी कमी असते. लोक आपल्या उत्पन्नातील बहुतांश भाग उपभोगावर खर्च करतात. त्यामुळे बचतीचे प्रमाण अल्प असते. भांडवलसंचयाचा दर कमी असतो. गुंतवणुकीची पातळी कमी असते. सार्वजनिक आयव्ययाच्या माध्यमातून सरकार 80-C अंतर्गत बचत करणाऱ्या लोकांना कर

HRM BUS ECONOMICS SYBCOM

सवलतीचे लाभ देते. त्यामुळे बचतपातळीत वाढ होते. मागास भागात गुंतवणूक करणाऱ्या उद्योजकांना कर सवलती आणि आर्थिक साहाय्य दिले जाते. काही वर्षे विक्री कर माफ केला जातो. सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे गुंतवणूक वाढीला चालना मिळते.

10. नियोजनाची अंमलबजावणी (Implementation of Planning) : भारतासारख्या नियोजित अर्थव्यवस्थेचा पुढाकार करणाऱ्या देशात भौतिक नियोजनापेक्षा वित्तीय नियोजन जास्त महत्त्वाचे असते. वित्तीय साधनांचा वापर करून आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वित्तपुरवठा उपलब्ध करून दिला जातो. त्यामुळे आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी येणारे आर्थिक अडथळे दूर होतात.

सरकारच्या प्राधान्यक्रमानुसार विविध प्रकल्पांना वित्तपुरवठा उपलब्ध केला जातो. सरकार दारिद्र्यरेषेखालील लोक, बेकार, दुर्लक्षित घटकांना आर्थिक साहाय्य देऊन त्याचा विकास साध्य करते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

4.4 कर : अर्थ आणि प्रकार

MEANING AND TYPES OF TAX

कर - अर्थ (Meaning of Tax)

सरकारच्या उत्पन्नाचा एक महत्त्वाचा स्रोत या अर्थाने 'कर' ही संकल्पना वापरली जाते.

सरकारला उत्पन्न प्राप्त करून देण्याचे सार्वजनिक आयव्ययाचे महत्त्वाचे एक प्रमुख साधन म्हणजे कर होय. सरकार जनतेच्या कल्याणासाठी विविध प्रकारच्या योजना राबविते तसेच देशातील जनतेला विविध प्रकारच्या सेवा व सुविधा उपलब्ध करून देते. सरकार देशाचा राज्यकारभार करताना प्रशासनासाठी पैशाची गरज असते. सरकार यासाठी जनतेकडून कराच्या मार्गाने उत्पन्न जमा करते. व्यक्तीच्या अथवा संस्थांच्या उत्पन्नातून सरकारने काढून घेतलेला सक्तीचा अंश म्हणजे कर होय. कर हे सक्तीचे देणे असते. सरकार कराच्या साहाय्याने जमा केलेल्या पैशाचा विनियोग जनतेच्या कल्याणासाठी करते.

भारतात कर आकारण्याचा अधिकार फक्त सरकारलाच आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था या करआकारणी करतात. इतर कोणत्याही व्यक्तीला अथवा संस्थेला कर आकारण्याचा अधिकार नसतो. व्यक्तीने सरकारला कर देण्याचे नाकारल्यास संबंधित व्यक्तीवर सरकार कायदेशीर कारवाई करते. कर हे केवळ

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सरकारच्या उत्पन्नाचे एक साधन नाही तर कर या साधनाच्या माध्यमातून सरकार वित्तीय धोरणाची उद्दिष्टे साध्य करते. उदाहरणार्थ, आर्थिक विकास, आर्थिक स्थैर्य, किंमत स्थैर्य, उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता कमी करणे, रोजगार वृद्धी इत्यादी.

कर ही संकल्पना समजून घेण्यासाठी कराच्या काही प्रमुख व्याख्या समजून घेणे महत्त्वाचे आहे.

- कर व्याख्या (Definitions of Tax)

पारंपरिक व्याख्या : “नागरिकांनी सरकारला सरकारी सेवेबद्दल दिलेला मोबदला म्हणजे कर होय." सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ

- **"आपल्या संपत्तीचा उपभोग निर्धास्तपणे घेण्यासाठी नागरिक आपल्या संपत्तीचा काही भाग सरकारला देतात त्याला कर असे म्हणतात." मॉन्टेस्क्यू**
- **"कराच्या रूपाने संपत्तीचा काही भाग सरकारला देऊन त्याच्या मोबदल्यात इतर संपत्ती उपभोगण्याची खात्री नागरिकाला प्राप्त होते." ब्लॅक स्टोन**

आधुनिक व्याख्या :

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांनी जुन्या कर संकल्पनेपेक्षा कराच्या वेगळया व्याख्या दिलेल्या आहेत.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

- **"कर म्हणजे व्यक्तीने किंवा संस्थेने स्वतःच्या संपत्तीचा सार्वजनिक सत्तेच्या सेवेसाठी दिलेला सक्तीचा भाग होय."** **बॅस्टबल**

- **“विशिष्ट लाभ विचारात न घेता सर्वांच्या सामान्य हितासाठी खर्च करता यावा म्हणून व्यक्तीकडून शासनाला मिळणारे सक्तीचे अंशदान म्हणजे कर होय."**

  - प्रा. सेलिगमन

- **"कर हे सार्वजनिक सत्तेने लादलेले असे देणे आहे की, ज्या देण्याच्या सरकारी सेवेशी निश्चित संबंध नसतो आणि जे कायदेशीर गुन्ह्याबद्दल दंड या अर्थाने कधीच घेतले जात नाही.”** **- डॉ. यूज डाल्टन**

आधुनिक काळात प्रा. सेलिगमन आणि प्रा. यूज डाल्टन यांच्या कराच्या व्याख्या या प्रातिनिधिक व्याख्या मानल्या जातात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

करांची वैशिष्ट्ये:

(1) करआकारणी सरकार करते. 'सरकार' या संज्ञेत केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था यांचा समावेश होतो.

(2) कर हे सक्तीचे देणे असते. कर नाकारता येत नाही.

(3) दिलेला कर आणि मिळणारा लाभ या दोहोंमध्ये कोणताही परस्परसंबंध नसतो.

(4) कर हे पात्र व्यक्ती, व्यक्तिसमूह किंवा संस्थांना भरावे लागतात. (5) कर वसुलीला कायदेशीर मान्यता असते.

(6) कराच्या मार्गाने मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग सरकार जनतेच्या कल्याणासाठी खर्च करते.

(7) कराची आकारणी उत्पन्न, खर्च, वस्तू, सेवा, नफा आणि व्याज यांवर केली

जाते. मात्र करवसुली व्यक्तीकडून सरकारी यंत्रणेमार्फत केली जाते.

(8) सरकारने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे कर हे नियमितपणे ठरावीक काळानंतर भरावे लागतात.

कराचे प्रकार (Types of Taxation)

कराचे स्वरूप, उद्देश, रचना, करपद्धती यांच्या आधारे करांचे विविध प्रकार पाडले जातात. त्यातील प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

(1) प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर ,

(2) सम प्रमाण कर, प्रगतिशील कर/पुरोगामी कर, प्रतिगामी करहासमान क्रमवीं कर

(3) विशिष्ट कर आणि मूल्यानुसारी कर.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(4) एक-करपद्धती आणि बहुकर पद्धती

(5) वर्धित मूल्य कर

1. प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर (Direct Tax and Indirect Tax)

प्रत्यक्ष कर (Direct Tax) :

- **" प्रत्यक्ष कर हे सरकारच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन आहे. "प्रत्यक्ष कर म्हणजे असे कर, ज्या करांच्या बाबतीत कायदेशीरपणे ज्या व्यक्तीवर कर लादलेला आहे तीच व्यक्ती कर भरते आणि कराचे ओझे सहन करते. कराचे ओझे दुसऱ्या व्यक्तीवर संक्रमित करता येत नाही..'** **- प्रा. डॉ. डाल्टन**

- **"ज्या व्यक्तीने कर भरावा असे सरकारला वाटते त्याच व्यक्तीकडून घेण्यात येणारा कर म्हणजे प्रत्यक्ष कर होय."** **- जे. एस. मिल**

उदाहरणार्थ, प्राप्ती कर, संपत्ती कर, देणगी कर, कंपनी कर, खर्च कर, व्याज कर, भांडवली नफा कर, वारसा हक्क कर, भांडवली लाभ कर.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रत्यक्ष कराचे फायदे/गुण :

(1) समता : प्रत्यक्ष कराचे दर ठरविताना व्यक्तीची करदेय क्षमता विचारात घेतली जाते. त्यामुळे श्रीमंतांवर जास्त आणि गरिबांवर कमी कर आकारले जातात. या करपद्धतीमुळे समता व न्याय प्रस्थापित होतो.

(2) निश्चितता : या करपद्धतीत सरकारला करआकारणीमुळे किती उत्पन्न मिळणार आणि व्यक्तीला कराची किती रक्कम द्यावी लागणार याचा अंदाज असतो.

(3) आर्थिक विषमतेत घट : प्रत्यक्ष करपद्धतीत गरिबांच्या तुलनेत श्रीमंतांवर जास्त कर आकारल्यामुळे उत्पन्न व संपत्तीतील विषमता कमी होते.

(4) लवचीकता : जेव्हा देशातील लोकांच्या उत्पन्नपातळीत वाढ होते तेव्हा सरकारचे कर उत्पन्न वाढते. उदाहरणार्थ, तेजीचा काळ. जेव्हा लोकांचे उत्पन्न कमी होते तेव्हा सरकारला कमी कर उत्पन्न मिळते. उदाहरणार्थ, मंदीचा काळ.

(5) काटकसर : प्रत्यक्ष कर भरणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी असल्याने कर वसुलीचा खर्च कमी येतो. उत्पन्न जास्त मिळते.

(6) जागरूकता : प्रत्यक्ष करामुळे कर दिलेल्या व्यक्तीला कर दिल्याची जाणीव असते. त्यामुळे सरकार या पैशाचा विनियोग कसा करणार याबाबत करदाता जागरूक असतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रत्यक्ष कराचे तोटे/दोष :

- **गैरसोय :** प्रत्यक्ष कर एकरकमी भरावा लागतो. त्यामुळे करदात्यांना प्रत्यक्ष कर गैरसोईचा वाटतो.

(2) कर चुकवेगिरी : प्रत्यक्ष कर टाळण्यासाठी खोटे हिशेब दाखविणे, उत्पन्न लपविणे, सरकारी अधिकाऱ्यांना भ्रष्ट करणे या मार्गांचा अवलंब केला जातो.

(3) लहरी स्वरूप : प्रत्यक्ष कराचे दर ठरविताना कोणतेही शास्त्रशुद्ध साधन नाही. सरकारी यंत्रणा किंवा अर्थशास्त्रज्ञ मनमानी पद्धतीने कराचे दर ठरवितात.

(4) खर्चीक : जेव्हा देशात करदात्यांची संख्या खूप जास्त असते आणि त्यांच्याकडून कमी रकमेचे कर वसूल केले जातात तेव्हा सरकारचा कर वसुलीचा खर्च अधिक येतो.

(5) अप्रिय : प्रत्यक्ष कर हे कमालीचे अप्रिय असतात. करदात्याला हे कर दिल्यामुळे जास्त त्याग करावा लागतो. कराचा भार दुसऱ्यावर ढकलता येत नाही. समाधानाची हानी होते.

(6) अन्यायकारक : प्रत्यक्ष कर प्रामाणिक लोकांवरील कर आहे. असा कर चुकविणारे अधिक असतात. खोटी संपत्ती दर्शविणाऱ्यांना कमी कर तर खरे उत्पन्न दर्शविणाऱ्यांना जास्त कर द्यावा लागतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

अप्रत्यक्ष कर (Indirect Tax):

- **ज्या करपद्धतीत कराघात एका व्यक्तीवर आणि करभार दुसऱ्या व्यक्तीवर पडतो त्याला अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. अप्रत्यक्ष कराचे संक्रमण होते.**

- **"अप्रत्यक्ष कर म्हणजे असे कर की, ज्यांचा भार दुसऱ्यावर ढकलता येतो.'**

- **"ज्या करांच्या बाबतीत करांचा आघात आणि करभार यात अंतर असते अशा करांना अप्रत्यक्ष कर असे म्हणतात."**

- **"अप्रत्यक्ष कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी उत्पादक अथवा विक्रेत्यांची असते. विक्रेते हा कर किमतीत समाविष्ट करून कराची रक्कम ग्राहकांकडून वसूल करतात." उदाहरणार्थ, उत्पादन शुल्क, विक्री कर, सीमा शुल्क, जकात, करमणूक कर, वाहतूक कर, पथ कर, प्रवासी कर, सेवा नोंदणी शुल्क. कर,**

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

अप्रत्यक्ष कराचे फायदे/गुण :

(1) सोईस्करपणा : अप्रत्यक्ष कर हे वस्तूच्या किमतीतून वसूल केले जातात. कराची रक्कम कमी असते. कर भरणाऱ्याला कर भरण्याची जाणीव नसते. हे कर भरण्यासाठी स्वतंत्र खर्च करावा लागत नाही. त्यामुळे सरकार आणि करदाते दोघांच्या दृष्टीने हा कर सोईस्कर असतो.

(2) कर चुकवेगिरी नाही : कर वस्तूच्या किमतीत समाविष्ट असल्याने वस्तू खरेदी केली की आपोआप कराचा भरणा होतो. त्यामुळे कर चुकवेगिरीला थारा नसतो.

(3) व्यापकता : प्रत्यक्ष कर समाजातील मोजके लोक देतात तर अप्रत्यक्ष कर देशातील प्रत्येक उपभोक्ता भरतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाकडून कर वसूल होतो.

(4) लवचीकता : अप्रत्यक्ष करापासून सरकारला केव्हाही आपले उत्पन्न वाढविता येते. कारण अप्रत्यक्ष कराच्या दरात केव्हाही वाढ करता येते. उदा., खाद्यतेल, मीठ, सिगारेट.

(5) उत्पादकता : अप्रत्यक्ष कर हे कमालीचे उत्पादक आहे. जेव्हा देशाच्या उत्पादन पातळीत व उत्पन्नपातळीत वाढ होते तेव्हा आपोआप सरकारचे कर उत्पन्न वाढते.

(6) सामाजिक कल्याण/समाज हित : अप्रत्यक्ष कराच्या माध्यमातून आरोग्याला घातक असणाऱ्या वस्तूंच्या उपभोगावर प्रतिबंध करता येतो. दारू, सिगारेट, गुटखा, तंबाखू, अफू, गांजा इत्यादींवर जास्त कर आकारून उपभोगात घट करता येते.

(7) पुरोगामित्व : चैनीच्या व महागड्या वस्तूचा जास्त कराने करआकारणीमुळे त्यांच्या किमती वाढतात व खर्च कमी होतो. राष्ट्रीय उत्पन्नाचा अपव्यय टाळला जातो आणि करपद्धती पुरोगामी होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

अप्रत्यक्ष कराचे तोटे/दोष :

(1) उत्पन्नाची अनिश्चितता: अप्रत्यक्ष करामुळे वस्तूंची किंमत वाढते, किंमत वाढल्यामुळे मागणीत घट होते. मागणी घटल्यामुळे सरकारचे उत्पन्न कमी होते. मागणीत जेवढी घट होईल तेवढे सरकारचे उत्पन्न घटते.

(2) खर्चीक : अप्रत्यक्ष कराच्या रकमा वसूल करण्यासाठी उत्पादक, ठोक विक्रेता, किरकोळ विक्रेते यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांची तपासणी करण्यासाठी जास्त सरकारी अधिकारी नेमावे लागतात. त्यामुळे कर वसुलीचा खर्च वाढतो.

(3) प्रतिगामी : श्रीमंत व गरीब यांच्याकडून एकाच दराने कर वसुली केल्यामुळे या करपद्धतीमुळे श्रीमंतांच्या तुलनेत गरिबांवर जास्त कराचा भार पडतो.

(4) अन्यायकारक : अप्रत्यक्ष करपद्धतीत श्रीमंतांच्या तुलनेत गरिबांना जास्त त्याग करावा लागतो. कारण श्रीमंतांच्या दृष्टीने पैशाची सीमांत उपयोगिता कमी असली तरी गरिबांच्या दृष्टीने ती जास्त असते.

(5) भाववाढीला चालना : अप्रत्यक्ष करपद्धतीत वस्तूच्या किमतीत कराचा समावेश केला जात असल्यामुळे कराचे दर वाढल्यास वस्तूची किंमत वाढते. त्यामुळे देशात भाववाढीला चालना मिळते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(6) जागरूकतेचा अभाव : अप्रत्यक्ष करपद्धतीत करदात्याला कर दिल्याची जाणीव होत नाही. त्यामुळे सरकार कराच्या रकमांचा विनियोग कसा करते याबाबत करदाते बेफिकीर असतात. त्यामुळे ते सरकारच्या कार्यावर अंकुश ठेवू शकत नाहीत.

2. सम प्रमाण कर, प्रगतिशील कर/पुरोगामी कर, प्रतिगामी कर, ह्रासमान क्रमवर्धी कर (Proportional Tax, Progressive Tax, Regressive Tax, Digressive Tax) :

(1) सम प्रमाण कर/प्रमाणशीर कर (Proportional Tax) :

प्रमाणशीर कर आकारताना व्यक्तीचे उत्पन्न विचारात घेऊन उत्पन्नाच्या प्रमाणात करआकारणी केली जाते. जेव्हा सर्व करदात्यांना समान दराने करआकारणी केली जाते तेव्हा त्या कराला 'प्रमाणशीर कर' असे म्हणतात.

कराच्या दर उत्पन्नाच्या दहा टक्के असेल तर 1,00,000 ₹ उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला 10,000 ₹; 2 लाख : 20,000 ₹; 3 लाख : 30,000 ₹ कर भरावा लागेल. या पद्धतीत व्यक्तीचे उत्पन्न वाढले अथवा घटले तरी कराचा दर सारखाच असतो. म्हणजेच उत्पन्न बदलले तरी कराचा दर बदलत नाही. सर्व करदाते उत्पन्नाचा समान भाग कररूपाने देतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सम प्रमाण कर/प्रमाणशीर कर - फायदे/गुण :

(1) ही करपद्धती अतिशय सोपी आहे.

(2) या पद्धतीत करदात्यांना सरकारला किती कर द्यावा लागेल हे सहज समजते. (3) या करपद्धतीमुळे उत्पन्न व संपत्तीच्या वितरणात बदल होत नाही. (4) या पद्धतीत करदात्यांना करावा लागणारा त्याग समान असतो.

(5) या करपद्धतीमुळे करदात्यांच्या काम व बचत करण्याच्या इच्छेवर प्रतिकूल परिणाम होत नाही.

सम प्रमाण कर/प्रमाणशीर कर - तोटे/दोष : .

(1) या पद्धतीमुळे अस्तित्वातील उत्पन्न व समाजातील विषमता कमी होत नाही. (2) या करपद्धतीमुळे श्रीमंतांपेक्षा गरिबांवर कराचा जास्त बोजा पडतो.

(3) या पद्धतीत कराचे दर स्थिर असल्यामुळे सरकारला फारशे कर उत्पन्न मिळत नाही.

(2) प्रगतिशील कर/पुरोगामी कर (Progressive Tax) :

ज्या करपद्धतीत उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर कराचे दर वाढत जातात त्याला प्रगतिशील'/पुरोगामी करपद्धती' असे म्हणतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

उदाहरणार्थ, * भारतात 2,50,000 रुपयांपर्यंत कर नाही. * अडीच लाख ते पाच लाखांपर्यंत 10 टक्के : 25,000; * पाच लाख ते दहा लाखांपर्यंत 20 टक्के : 1,00 0; * दहा लाख रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या करदात्यांच्या उत्पन्नावर तीस टक्के दराने करआकारणी केली जाते.

ज्या व्यक्तीचे उत्पन्न जास्त असते त्याला जास्त कर भरावा लागतो. श्रीमंत लोकांचे उत्पन्न जास्त असल्यामुळे उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर पैशाची सीमांत उपयोगिता घटते. त्यामुळे ते अधिक कर देण्यास तयार होतात. जगातील बहुतेक सर्व देशांत हीच करपद्धती आहे.

प्रगतिशील/पुरोगामी कर - फायदे/गुण :

(1) या पद्धतीत करदेय क्षमतेचा विचार करून करआकारणी केली जाते.

(2) या पद्धतीमुळे संपत्तीच्या उत्पन्न, संपत्ती आणि मालमत्तेचे न्याय्य वाटप होते.

(3) करपद्धती उत्पादक असून उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर कराचे दर वाढल्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढते. हा कर एकरकमी भरावा लागत असल्यामुळे कर वसुलीचा खर्च कमी येतो.

(4) या करपद्धतीमुळे भाववाढ रोखता येते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

प्रगतिशील/पुरोगामी कर - तोटे/दोष :

(1) या करपद्धतीत खोटे उत्पन्न दाखवून कर चुकवेगिरी मोठ्या प्रमाणात केली जाते. (2) करपद्धतीत श्रीमंत लोकांची संख्या कमी असल्यामुळे सरकारला कमी कर उत्पन्न प्राप्त होते.

(3) या करपद्धतीत कराचे दर ठरविताना कोणतीही शास्त्रीय पद्धत नाही. मनमानी पद्धतीने सरकार कराचे दर ठरविते.

(4) प्रगतिशील करामुळे लोकांच्या काम व बचत करण्याच्या इच्छेवर प्रतिकूल परिणाम होतो.

(3) प्रतिगामी कर (Regressive Tax) :

उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर जेव्हा कराचे दर कमी होत जातात तेव्हा त्या करपद्धतीला 'प्रतिगामी करपद्धती' असे म्हणतात.

प्रतिगामी करपद्धतीत उत्पन्नात घट झाली तर कराचे दर वाढत जातात आणि उत्पन्नत वाढ झाली तर कराचे दर घटत जातात.

उदाहरणार्थ, 1,00,000 ₹ उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला 15 टक्के दराने करआकारणी (15,000); 2 लाखावर 10 टक्के (20,000); 3 लाखावर 8 टक्के (24,000).

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

थोडक्यात, प्रतिगामी करपद्धतीत कमी उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला अधिक दराने कर द्यावे लागतात तर अधिक उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला कमी दराने कर द्यावा लागतो. ज्या देशात गरीब लोकांची संख्या जास्त आहे त्या देशात प्रतिगामी करपद्धतीने करआकारणी केल्यास सरकारला जास्त कर उत्पन्न मिळेल. ही करपद्धती समता व न्याय या दोन्ही तत्त्वांच्या विरोधात आहे. कारण या पद्धतीत श्रीमंताच्या तुलनेत गरिबांना जास्त कर द्यावे लागतात. त्यामुळे आर्थिक विषमता वाढत जाते. म्हणून आधुनिक काळात या पद्धतीने करआकारणी केली जात नाही. मात्र काही अनावश्यक वस्तूंचा उपभोग टाळण्यासाठी या पद्धतीने करआकारणी करणे योग्य असते.

(4) -हासमान क्रमवर्धी कर (Digressive Tax) :

-हासमान क्रमवर्धी करपद्धतीत सुरुवातीला उत्पादनात होणाऱ्या वाढीबरोबर एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उत्पन्न होईपर्यंत कराचे दर वाढत जातात आणि त्यानंतर स्थिर दराने करआकारणी केली जाते. याचाच अर्थ, सुरुवातीच्या काळात प्रगतिशील दराने कर आकारणे आणि नंतर सम प्रमाणात करआकारणी केली जाते.

थोडक्यात, -हासमान क्रमवर्धी कर हा प्रगतिशील व सम प्रमाण कर यांचे एकत्रीकरण आहे.

पुढील आकृती क्र. 4.1 मध्ये B पासून C बिंदूपर्यंत प्रगतिशील दराने करआकारणी दर्शविलेली आहे तर पासून R पर्यंत स्थिर दराने करआकारणी केली जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM



-ह्रासमान क्रमवर्धी करपद्धतीत श्रीमंत व गरीब वर्गावर विशिष्ट मर्यादेनंतर समान दराने करआकारणी केली जाते. श्रीमंतांच्या तुलनेत गरिबांचे उत्पन्न कमी असल्यामुळे गरिबांवर कराचा जास्त भार पडतो. हे समता तत्त्वाच्या अगदी विरुद्ध आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

3. विशिष्ट कर आणि मूल्यानुसारी कर :
(Specific Tax and Ad-valorem Tax)

(1) विशिष्ट कर (Specific Tax) :

जेव्हा वस्तूच्या किंवा मालाच्या वजन, आकार किंवा एखादे विशिष्ट मापन विचारात घेऊन कर आकारला जातो तेव्हा त्या कराला 'विशिष्ट कर' असे म्हणतात.

उदाहरणार्थ, साखरेचा दर क्विंटलला विशिष्ट उत्पादन-शुल्क आकारले जाते किंवा कापडाच्या बाबतीत लांबी किंवा वजनानुसार कर आकारला जातो. विशिष्ट कर फायदे :

(1) सोपेपणा : विशिष्ट कर हा वजन व लांबीनुसार आकारला जातो. त्यामुळे प्रशासनाला हा कर गोळा करणे सोपे जाते.

(2) भाववाढविरोधी : विशिष्ट करआकारणीमुळे वस्तूंची किंमत वाढत नसल्याने भाववाढ होत नाही.

(3) निश्चितता : या पद्धतीतून करआकारणी करताना वजन हा आधार घेतल्यामुळे निश्चितता ही कसोटी पूर्ण होते.

(4) सुलभता : सरकारला वजनानुसार किंवा लांबीनुसार कर गोळा करणे सोपे किंवा सुलभ जाते.

(5) कर चुकवेगिरीला वाव नाही : विशिष्ट करपद्धतीत वजन विचारात घेऊन करआकारणी केली जाते. त्यामुळे कर चुकवेगिरीला वाव नसतो.

विशिष्ट कर दोष :

(1) कमी लवचीक : विशिष्ट करपद्धतीत वस्तूच्या किमती वाढल्या तरी करापासून उत्पन्न वाढत नाही.

(2) अन्यायकारक : विशिष्ट करपद्धतीनुसार करआकारणी केल्यास गरीब व श्रीमंताला एकाच दराने कर द्यावा लागतो. त्यामुळे गरिबांवर या कराचा जास्त भार पडतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(3) कमी खर्चीक : वजन करतेवेळी करआकारणी केली जात असल्यामुळे कर गोळा करण्याचा खर्च कमी येतो.

(2) मूल्यानुसारी कर (Ad-valorem Tax) :

जेव्हा वस्तूवर तिच्या मूल्यानुसार कर आकारले जातात तेव्हा त्या करांना 'मूल्यानुसार कर म्हणतात. वस्तूचा आकार, वजन कितीही असले तरी त्याचा विचार न करता वस्तूच्या मूल्याचा विचार करून करआकारणी केली जाते. उदा., मूल्यानुसार करआकारणी करताना वस्तूच्या आयात मूल्यावर पाच टक्के आयात-कर आकारला जातो.

मूल्यानुसारी कर - फायदे/गुण :

(1) अधिक लवचीक व उत्पादक : मूल्यानुसारी करपद्धतीमुळे वस्तूच्या किमतीत वाढ झाल्यास सरकारच्या कर उत्पन्नातही वाढ होते.

(2) कर वसुलीचा खर्च कमी : या कराचा समावेश वस्तूच्या किमतीत होत असल्यामुळे खरेदी-विक्री करतानाच कराची वसुली होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(3) समता तत्त्व : या पद्धतीत श्रीमंत लोक वापरत असलेल्या जास्त किमतीच्या वस्तूवर जादा दराने व गरीब लोक वापरत असलेल्या कमी किमतीच्या वस्तूवर कमी दराने करआकारणी केली जाते.

मूल्यानुसारी कर - दोष/तोटे :

(1) प्रशासकीयदृष्ट्या किचकट : मूल्यानुसार करआकारणी करताना प्रत्येक वस्तूची किंमत वेगवेगळी असताना सरकारला कराची रक्कम ठरविणे कठीण जाते.

(2) भाववाढीला चालना : जेव्हा वस्तूची किंमत वाढते तेव्हा कराचे दरही वाढतात. त्यामुळे भाववाढीला चालना मिळते.

(3) निश्चिततेचा अभाव : मूल्यानुसार करआकारणी करताना निश्चितता हा गुणधर्म नसतो. कारण व्यक्तीनुसार प्रत्येक वस्तूची किंमत वेगवेगळी ठरविली जाते.

(4) वस्तूचे मूल्य : बऱ्याचदा वस्तूचे मूल्य ठरविणे अवघड असते. वस्तूची किंमत कमी दाखवून कर-चोरी करण्याचा प्रयत्न केला जातो.

4. एक-करपद्धती आणि बहुकरपद्धती :

(Single Tax System and Multiple Tax Systems)

(1) एक-करपद्धती (Single Tax System):

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

एक-करपद्धती ही प्रामुख्याने एकाच करावर आधारित आहे. कराची विशेष वैशिष्ट्ये विचारात घेऊन या कराची आकारणी केली जाते. उदाहरणार्थ, जमिनीच्या मूल्यावर आकारला जाणारा कर.

व्याख्या : "जेव्हा देशात एकाच वस्तूवर कर आकारला जातो किंवा एकच कराच्या माध्यमातून कर उत्पन्न मिळविले जाते अशी करपद्धती म्हणजे एक-करपद्धती होय." सतराव्या शतकात जॉन लॉकी आणि बॅरुच स्पिनोझा यांनी जमिनीच्या मूल्यावर करआकारणी करावी असा प्रस्ताव मांडला होता.

निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांनी भूमीवरच कर आकारावा असे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, सर्व करांचा अंतिम भार भूमीवर पडतो. शेती हाच एकमेव उत्पादक व्यवसाय आहे. शेती या व्यवसायातूनच फक्त बचत प्राप्त होते. अन्य कोणत्याही व्यवसायावर कर आकारला तर त्या कराचे संक्रमण होऊन शेवटी कराचा भार जमीनदारावरच पडेल. जर भूमीवर कर आकारला तर कर संक्रमण आणि संघर्ष समाप्त होईल.

हेन्री जॉर्ज यांनी 'Progress and Poverty' या आपल्या ग्रंथात पुढील दोन कारणांमुळे भूमीवर कर आकारणे संयुक्तिक होईल असे सुचविले.

(1) भूमीपासून मिळणारे उत्पन्न अनर्जित असते.

(2) भूमीवर कर आकारल्यामुळे औद्योगिक प्रगतीत कोणतीही बाधा येत नाही. भूमीप्रमाणेच मालमत्ता, वस्तू किंवा उत्पन्नावर एक-कर आकारता येऊ शकतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

एक-करपद्धती अतिशय सरळ व सोपी आहे. या पद्धतीत कर वसुलीचा खर्च कमी येतो. करभाराचे विश्लेषण समता आणि न्याय तत्त्वानुसार होते. चांगल्या करपद्धतीचा वस्तुनिष्ठ उद्देश या पद्धतीतून साध्य होत नसल्याने ही पद्धत अकार्यक्षम आहे. या करपद्धतीमुळे सरकारला पुरेसे कर उत्पन्न प्राप्त होत नाही. राष्ट्रीय उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी कर उत्पन्नात वाढ करता येत नाही.

(2) बहुकर पद्धती (Multiple Tax System) :

आज जगात बहुकर पद्धतीचा अवलंब अनेक देशांनी केलेला आहे.

व्याख्या : "विविध प्रकारच्या बाबींवर किंवा आधारावर जेव्हा करआकारणी केली जाते तेव्हा त्या कर पद्धतीला बहुकर पद्धती असे म्हणतात."

आधुनिक अर्थव्यवस्थेचे एकच उद्दिष्ट नसते तर आर्थिक वृद्धी, उत्पन्न आणि संपत्तीचे न्याय्य वाटप, आर्थिक स्थैर्य इत्यादी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध प्रकारच्या करांची आकारणी करणे आवश्यक असते. काही करांच्या माध्यमातून संतुलित प्रादेशिक वृद्धी साध्य केली जाते. तसेच सरकारला विविध कार्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी विविध करांची आकारणी करून सरकारी तिजोरीत पुरेसा निधी जमा केला जातो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

बहुकर पद्धतीमुळे कर टाळण्याला आळा बसतो. सरकारला या पद्धतीच्या माध्यमातून कर उत्पन्नात वाढ करता येते. एक-कर पद्धतीपेक्षा ही पद्धती जास्त लवचीक आहे. बहुकर पल्दतीमध्ये समता, उत्पादकता, लवचीकता, पर्याप्तता, विविधता इत्यादी कर तत्त्वे दिसून येतात. या पद्धतीत करभाराचे न्याय्य वितरण करता येते. करदेय क्षमतेनुसार करआकारणी करता येते. उत्पन्न व संपत्तीचे न्याय्य वाटप करून आर्थिक विकासाला गती देता येते.

अर्थात, बहुकर पद्धतीमध्ये करांची संख्या अवास्तव वाढल्यास गुंतागुंत निर्माण होऊन ही पद्धती खर्चीक, त्रासदायक आणि अन्यायाची ठरू शकते. म्हणून बहुकरपद्धती स्वीकारताना करांची संख्या मर्यादित ठेवली पाहिजे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

5. वर्धित मूल्य कर (Value Added Taxes) :

वस्तूंच्या किंवा सेवांच्या मूल्यवाढीवर आकारला जाणारा कर म्हणजे वर्धित मूल्य कर होय. उद्योजकाने उत्पादन आणि विभाजनाच्या प्रक्रियेत ज्या टप्प्यात वस्तूंच्या मूल्यात वाढ केली त्या टप्प्यात वर्धित मूल्यावर करआकारणी केली जाते. वस्तूंच्या मूल्यवर्धनाच्या प्रत्येक टप्प्यावर हा कर आकारला जातो.

व्याख्या : "वर्धित मूल्य कर म्हणजे सर्वसाधारण उपभोग कर होय; जो वस्तू व सेवांच्या मूल्यवाढीवर बसविला जातो."

एल. के. झा यांच्या मते, “वर्धित मूल्य कर म्हणजे व्यापक स्वरूपात सर्व प्रकारच्या वस्तू व सेवांवरील कर होय. या कराची आकारणी करताना निर्मित वस्तू व सेवा आणि सरकारी वस्तू व सेवा वगळलेल्या आहेत."

थोडक्यात, वर्धित मूल्य करपद्धतीत वस्तू उत्पादनात प्रत्येक टप्प्यात वस्तूच्या मूल्यात जी निव्वळ वाढ होते त्या मूल्यवाढीवर हा कर आकारला जातो. वर्धित मूल्य कर हा अप्रत्यक्ष कर आहे. उत्पादन कर, विक्री कर, उलाढाल कर या करांना पर्याय म्हणून या कराचा वापर केला जातो. या करामध्ये करावर कर घेतले जात नसल्याने कराची पुनरावृत्ती टाळली जाते. व्यापारी, उद्योजक व व्यावसायिकांना एका विशिष्ट मर्यादेपर्यंत कमी व्यवहारावर या करातून सूट दिली जाते.

वर्धित मूल्य कराचे फायदे :

(1) वर्धित मूल्य करपद्धती साधी व सोपी आहे.

(2) वर्धित मूल्य करामुळे करपद्धतीत एकसूत्रता येते

3) वर्धित मूल्य कर एका वस्तूवर एकदाच घेतला जातो.

4) वर्धित मूल्य करामुळे सरकारच्या उत्पन्नात वाढ होते

5) वर्धित मूल्य करामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

वर्धित मूल्य कराचे तोटे :

(1) वर्धित मूल्य करपद्धती क्लिष्ट व किचकट स्वरूपाची आहे.

(2) वर्धित मूल्य करपद्धतीत कर चुकवेगिरीला वाव असतो.

(3) वर्धित मूल्य करपद्धतीत हिशेबाच्या नोंदी ठेवणे अवघड असते.

(4) वर्धित मूल्य करपद्धती समता कर तत्त्वाच्या विरोधी आहे.

(5) वर्धित कर मूल्यपद्धतीची अंमलबजावणी करणे अवघड आहे.

4.5 सार्वजनिक खर्च : अर्थ आणि वाढ होण्याची कारणे

PUBLIC EXPENDITURE : MEANING AND CAUSES OF INCREASING PUBLIC EXPENDITURE

सार्वजनिक खर्च - अर्थ (Meaning of Public Expenditure)

सार्वजनिक खर्च सार्वजनिक आयव्ययाचे एक महत्त्वाचे अंग आहे. सार्वजनिक गरजांच्या पूर्ततेसाठी सरकारकडून केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय. सरकार जनतेकडून कराच्या मार्गाने जो पैसा गोळा करते त्या पैशाचा विनियोग सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून सरकार देशातील विविध विकास योजना आणि जनतेच्या कल्याणावर खर्च करते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्चाचा विनियोग रस्ते, रेल्वे, पाणीपुरवठा, वीजनिर्मिती, पाटबंधारे, वाहतूक आणि दळणवळण इत्यादी पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी केला जातो. पायाभूत सुविधांच्या निर्मितीमुळे देशात शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, बँकिंग, विमा इत्यादी क्षेत्रांच्या विकासाला चालना मिळून आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार होते. सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून शिक्षण व आरोग्य या सामाजिक सेवांची निर्मिती केल्यामुळे मानवी संसाधनाचा दर्जा सुधारतो. सार्वजनिक क्षेत्रात उद्योगाची उभारणी केल्यामुळे देशात पायाभूत व अवजड उद्योगांची स्थापना होऊन औद्योगिक विकासाचा पाया मजबूत होतो. त्यामुळे देशाच्या उत्पादन, रोजगार आणि उत्पन्न पातळीत वाढ होते.

सार्वजनिक खर्चाचा काही भाग सरकार अंध, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, निराधार, विधवा, समाजातील दुर्बल घटक, मागासवर्गीय यांच्या कल्याणासाठी खर्च करते. त्यामुळे गरिबांच्या उत्पन्न पातळीत वाढ होऊन आर्थिक विषमता कमी होते.

मंदीच्या काळात कराच्या तुलनेत सार्वजनिक खर्च हे साधन जास्त प्रभावी आहे. मंदी आटोक्यात आणण्यासाठी कर कपातीपेक्षा सार्वजनिक खर्चात वाढ करणे जास्त श्रेयस्कर असते. अशा रीतीने आर्थिक विकासाला चालना देणे, आर्थिक स्थैर्य प्रस्थापित करणे, रोजगार वृद्धीला चालना देणे आणि आर्थिक विषमता कमी करणे ही राजकोषीय धोरणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सार्वजनिक खर्च हे राजकोषीय धोरणाचे प्रमुख साधन म्हणून वापरले जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्च - व्याख्या

"सामूहिक गरजांच्या पूर्ततेसाठी सरकारने केलेला खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

वरील व्याख्येत निवृत्ती वेतन, पायाभूत सुविधांवरील खर्च तसेच बिगर-विकासेतर खर्चात कायदा व सार्वजनिक प्रशासनावर केला जाणारा खर्च समाविष्ट होतो.

"संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या देखभालीसाठी सरकारकडून केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय."

" "समाजाच्या पातळीवर सामुदायिकपणे उपभोग घेतल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांच्या निर्मितीवर सरकारकडून केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय.

"लोकांच्या सामुदायिक सामाजिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सार्वजनिक अधिसत्तेकडून म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून केला जाणारा खर्च म्हणजे सार्वजनिक खर्च होय."

HRM RUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये :

सार्वजनिक खर्चाच्या वरील व्याख्यांवरून सार्वजनिक खर्चाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

(1) सार्वजनिक खर्च सरकारमार्फत केला जातो. 'सरकार' या संज्ञेत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचा समावेश होतो.

(2) सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून लोकांच्या सामुदायिक गरजांची पूर्तता केली जाते. उदाहरणार्थ, रस्ते, रेल्वे, शिक्षण, आरोग्य, संरक्षण, अंतर्गत सुरक्षितता इत्यादी.

(3) सार्वजनिक खर्चांतर्गत विकासात्मक आणि विकासेतर खर्च केला जातो.

विकासात्मक खर्च देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाशी प्रत्यक्ष संबंधित असतो. उदाहरणार्थ, शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, शेती, औद्योगिक विकास, ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण, शासकीय संशोधन इत्यादी.

विकासेतर खर्च हा नियमित स्वरूपाच्या आवश्यक सर्वसाधारण सेवा सरकार पुरविते त्यांच्याशी निगडित असतो. उदा., संरक्षण, प्रशासन, पोलीस, न्याययंत्रणा, सर्वसाधारण प्रशासन, कर संकलन, आर्थिक साहाय्य इत्यादी.

(4) सार्वजनिक खर्चाद्वारे सार्वजनिक उपयोगितेची तरतूद केली जाते.
उदा., पाणीपुरवठा, रस्ते, वीजनिर्मिती, पोस्टल सेवा, गॅस. सार्वजनिक उपयोगिता सेवेमुळे जनतेला योग्य किमतीत सेवा उपलब्ध होतात.

(5) सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून जनतेच्या कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात. तसेच देशाच्या आर्थिक विकासाला चालना दिली जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कारणे

(Causes of Increasing Public Expenditure)

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थन केलेले होते. पोलिसी राज्यात सरकारची कार्ये आणि जबाबदाऱ्या मर्यादित होत्या. सार्वजनिक खर्चाचे प्रमाण अल्प होते.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुतेक देशांनी कल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारली. कल्याणकारी राज्याच्या भूमिकेमुळे सरकारच्या कार्ये आणि जबाबदाऱ्या यामधी मोठ्या प्रमाणात वाढ झाली. परिणामी, सरकारच्या सार्वजनिक खर्चात सातत्याने वाढ होत आहे.

उदाहरणार्थ, सन 1950-51 मध्ये केंद्र सरकारचा एकूण खर्च 530 कोटी रुपये होता. सन 1980-81 मध्ये सार्वजनिक खर्च 24,170 कोटी रुपयांपर्यंत वाढला. सन 2003-04 मध्ये सार्वजनिक खर्च 4,43,800 कोटी रुपयांपर्यंत वाढला. सन 2019-20 मध्ये सरकारचा एकूण खर्च 27,86,349 कोटी रुपयांपर्यंत वाढला. सन 1950-51 ते 2019-20 या कालावधीत केंद्र सरकारच्या एकूण खर्चात 5,257 पट वाढ झाली.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्चात वेगाने वाढ होण्यासाठी पुढील कारणे जबाबदार आहेत :

1. लोकसंख्यावाढ (Population Growth) : विकसनशील देशात लोकसंख्या वेगाने वाढत आहे. सन 1950-51 मध्ये भारताची लोकसंख्या 36.5 कोटी होती. सन 2011 मध्ये भारताची लोकसंख्या 121 कोटींपर्यंत वाढली. वाढत्या लोकसंख्येला शिक्षण, आरोग्य, वाहतूक व दळणवळण, पाणी, वीज, अन्नधान्य आणि जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करण्यासाठीचा खर्च वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येच्या नियंत्रणासाठी पर्यावरण संरक्षण आणि प्रदूषण नियंत्रण यावरील सरकारचा खर्च सातत्याने वाढत आहे.

2. सरकारच्या कार्यामधील वाढ (Increase in the Activities of the State) : उपभोक्त्यांना सरकारकडून पुरविल्या जाणाऱ्या (मोफत किंवा अल्प दराने) सेवांच्या संख्येत खूप विस्तार झालेला आहे. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक करमणुकीच्या सुविधा ही नेहमीची सार्वजनिक सेवांची उदाहरणे आहेत. त्याचबरोबर सरकारकडून अल्प दराने औषधे आणि घरांचा पुरवठा केला जातो. उदाहरणार्थ, भारतातील इंदिरा घरकुल योजना, रेल्वे, रस्ते, जलसिंचन प्रकल्प यांसारख्या योजना रोजगारनिर्मितीसाठी सरकारकडून राबविल्या जातात. अर्थव्यवस्थेला मंदीतून बाहेर काढण्यासाठी अशा प्रकारचे खर्च केले जातात. प्रा. वॅग्नर यांच्या मते, सरकारच्या कार्यामध्ये सखोल (Intensive) आणि विस्तृत (Extensive) वाढ झालेली आहे. सरकार नवनवीन कामे हातात घेत आहेत आणि जुन्या कामामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे सार्वजनिक खर्चामध्ये अलीकडच्या काळात वेगाने वाढ होत आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

3.विकास (Industrial Development) : औद्योगिक विकासामुळे फक्त उद्योगाचाच विकास होतो असे नाही तर देशाची राजकीय व सामाजिक संरचना बदलते. औद्योगिक विकासासाठी संशोधनाची गरज असते. त्यामधून राजकीय व सामाजिक घटकांमध्येही बदल होतो. उद्योगातील उत्पादनात वाढ झाल्याने उत्पन्न आणि जीवनमान पातळीत वाढ होते. लोकसंख्येच्या गरजाही बदलतात. नवीन कामगार समस्या उभ्या राहतात. नवीन कामगार संबंध प्रस्थापित होतात. उद्योगाचे नियंत्रण, ग्राहकांचे संरक्षण, संपत्ती आणि उत्पन्न वितरणाच्या समस्या अशा अनेक समस्या औद्योगिक विकासामधून निर्माण होतात. त्यामुळे सरकारला आपल्या खर्चामध्ये वाढ करावी लागत आहे.

4. सामाजिक सुरक्षा योजना (Social Security Measure) : आधुनिक सरकारने लोकांच्या हिताची जपवणूक करण्याची जबाबदारी घेतलेली आहे. त्यामुळे सरकारला विविध प्रकारच्या योजना हाती घ्याव्या लागत आहेत. कामगारांना योग्य वेतन दिले जाते की नाही, कामगार सुरक्षेसाठी अंतर्गत पुरेशा उपाययोजना केलेल्या आहेत की नाही हे बघण्याची जबाबदारीदेखील सरकारने घेतलेली आहे. म्हणून निवृत्ती वेतन योजना, आजारपणातील फायदे, अपघाती फायदे, औद्योगिक कामगारांसाठी मोफत शिक्षण आणि वैद्यकीय सुविधा यांसारख्या विविध बाबींवर सरकारला खर्च करावा लागत आहे. त्यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे.

5. उद्योग आणि व्यापाराचे राष्ट्रीयीकरण (Nationalisation of Industries and Trade) : उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणामुळे वस्तू व सेवा यांचा व्यापार हा अव्यापारी तत्त्वावर चालतो. अर्थव्यवस्थेतील मक्तेदारीचे नियंत्रण करून उपभोक्त्यांना कमी

HRM BUS ECONOMICS SYBCOM

किमतीला वस्तू आणि सेवांचा पुरवठा करण्यासाठी सरकार राष्ट्रीयीकरण करत आहे. त्यामुळे उत्पन्न आणि संपत्ती वितरणाची स्थिती सुधारून कामगारांच्या स्थितीमध्ये सुधारणा होईल. परंतु नुकसानभरपाई देणे, प्रकल्प स्थापन करणे आणि तो चालविणे यासाठी प्रचंड प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे वस्तूचा वाजवी दराने पुरवठा होण्यासाठी सरकार खाजगी व्यवसाय आणि व्यापार ताब्यात घेतात; यामुळे सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे.

6. शेती विकास (Development of Agriculture) : भारतासारख्या विकसनशील देशामध्ये शेती विकासाला अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाचे स्थान आहे. शेती आणि बिगर-शेती क्षेत्रातील संबंधाची जाणीव सरकारला झालेली आहे. या दोन क्षेत्रांमधील आंतरक्रियेने आर्थिक वृद्धीला चालना मिळते. उदाहरणार्थ, शेती उत्पन्नात वाढ झाल्यास औद्योगिक मालाची उपभोगासाठी मागणी वाढते. त्याचप्रमाणे औद्योगिक विकास झाला तर शेती उत्पादनाचीही मागणी वाढेल. म्हणजेच ही दोन्ही क्षेत्रे एकमेकांवर अवलंबून आहेत. म्हणून भारतासारख्या अल्पविकसित देशात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी अगोदर शेती विकासाला चालना देणे गरजेचे आहे. भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून शेती विकासाच्या अनेक योजना राबविण्यास सुरुवात केल्याचे दिसते. तसेच शेती संशोधन व भूसंधारण कार्यक्रमासाठी भारतात आज मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे.

7. किमतीमधील वाढीची प्रवृत्ती (Rising Trend of Prices) : किमतीमधील वाढीच्या प्रवृत्तीमुळे आज प्रत्येक देशात सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे. वाढणाऱ्या

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

किमतीमुळे सरकारला ज्या वस्तू आणि सेवा लागतात त्यासाठी सरकारला अधिक खर्च करावा लागतो. त्याचप्रमाणे वाढत्या किमतीमुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात आणि महागाई भत्त्यात वाढ करावी लागते. अशा परिस्थितीत सरकारच्या कामाचा विस्तार न होतादेखील सार्वजनिक खर्चात वाढ होते.

8. संरक्षणविषयक समस्या (Problem of Defense) : देशाच्या संरक्षणविषयक समस्यांमुळे सार्वजनिक खर्चात वेगाने वाढ होत आहे. एका देशाने संरक्षणावर अधिक खर्च केला की दुसऱ्या देशाला संरक्षणावर अधिक खर्च करावाच लागतो. आज युद्धाचे आणि युद्ध साधनसामग्रीचे स्वरूप खूप खर्चीक झालेले आहे. त्यामुळे संरक्षणविषयक खर्चात वेगाने वाढ घडून येत आहे. आज सर्वच देशांचा संरक्षणविषयक खर्च वाढत आहे. सैन्यभरती, सैन्याचे प्रशिक्षण, हवाई दल, नाविक दल यांवर प्रचंड प्रमाणात खर्च करावा लागतो

9. नागरिकीकरण/शहरीकरण (Urbanisation) : नागरी लोकसंख्येचे प्रमाण वाढले की सार्वजनिक खर्च आपोआप वाढतो, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. जलद नागरिकीकरणामुळे पाणीपुरवठा, रस्ते, मलनिस्सारण, आरोग्यविषयक सुविधा यांसारख्या बाबींवरील खर्च मोठ्या प्रमाणात वाढतो. सरकारला दवाखाने, रस्ते, रस्त्यांवरील दिवे, खेळाची मैदाने, बगिचे यांची उभारणी करावी लागते. यांवरदेखील सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो.

10. सरकारकडे बघण्याच्या दृष्टिकोनातील बदल (Change in Attitude Towards Government) : सरकारकडे बघण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन बदलत असल्याने

HRMBUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे. आज सरकारशिवाय कोणतीही व्यक्ती आलिशान जीवनमान जगू शकत नाही. म्हणजेच सरकारने विविध प्रकारच्या सेवासुविधा पुरविल्या पाहिजेत अशी लोकांची अपेक्षा असते. पूर्वीच्या सरकारचे पोलिसी राज्याचे स्वरूप जाऊन त्यांची जागा कल्याणकारी राज्यांनी घेतलेली आहे. त्यामुळे आधुनिक काळात सार्वजनिक खर्चात प्रचंड वाढ होत आहे.

11. आर्थिक विकास (Economic Development) : अल्पविकसित देशात सार्वजनिक खर्चात वेगाने वाढ होत आहे. वाहतूक, दळणवळण, ऊर्जा यांसारख्या पायाभूत सेवासुविधांचा विकास ही आर्थिक मूलभूत अट आहे. उद्योगांच्या जलद विकासासाठी या सुविधा विकसित करणे गरजेचे असते. या व्यतिरिक्त आर्थिक मदत, कर्जपुरवठा या मार्गांनी शेती व उद्योजकांना आर्थिक मदत करण्याचे धोरण सरकार स्वीकारत आहे. त्याचप्रमाणे तांत्रिक मदत आणि कच्च्या मालाचा पुरवठा यामार्फत शेती व उद्योगाला सरकार मदत करीत असते. म्हणून विकासात्मक नियोजनाच्या वाढीमुळे सरकारच्या खर्चात खूप मोठी वाढ झाली आहे.

12. आर्थिक वृद्धी आणि सामाजिक न्याय (Growth and Social) सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे देखील आर्थिक नियोजनाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट असते. आतापर्यंत राष्ट्रीय उत्पादनवृद्धीच्या दरावरच आर्थिक विकासाच्या धोरणात भर देण्यात आलेला आहे. तथापि, राष्ट्रीय उत्पादनातील वाढीमुळे दारिद्र्यनिर्मूलन होत नाही असा आतापर्यंतचा अनुभव आहे. तसेच रोजगारावरही फारसा परिणाम होत नाही असे आढळून आले. काही वेळेस आर्थिक वृद्धीमधून बेकारी आणि विषमता वाढीस लागते. भारताचा अनुभवही

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

यापेक्षा वेगळा नाही. म्हणून बेरोजगारी आणि दारिद्र्याची समस्या सोडविण्यासाठी वेगळया उपाययोजना करण्याची गरज आहे. आज अनेक विकसनशील देशांमध्ये समाजातील दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांवर सरकार प्रचंड खर्च करीत आहे.

13. लोकशाही राजकीय प्रणालीचा स्वीकार (Use of Democratic Political System) : आज बहुतेक देशांमध्ये लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार करण्यात आलेला आहे. या शासनप्रणालीमध्ये स्थानिक, जिल्हा, राज्य आणि केंद्र या स्तरांवर विविध प्रकारच्या शासनसंस्था असतात. या संस्थांमध्ये खूप मोठा कर्मचारीवर्ग असतो. त्या कर्मचाऱ्यांचा पगार हा शासन खर्चाचा एक महत्त्वाचा भाग आहे. विविध स्तरांवरील लोकशाही शासनसंस्थांच्या दर पाच वर्षांनी निवडणुका घ्याव्या लागतात. या निवडणुकांसाठी सरकारला प्रचंड खर्च करावा लागतो.

14. आंतरराष्ट्रीय संबंधातील वाढ (Increased in International Relations) : आधुनिक काळात देशाचे जगातील विविध देशांबरोबर आंतरराष्ट्रीय संबंध वाढत आहेत. उद्योग, व्यापार, शिक्षण, संस्कृती या माध्यमातून ते एक देश दुसऱ्या देशाबरोबर सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, व्यापार व उद्योगविषयक संबंध प्रस्थापित करीत आहेत. त्यासाठी सरकारच्या खर्चात सातत्याने वाढ होताना दिसते. त्याचप्रमाणे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, युनो व इतर प्रकारच्या आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये प्रतिनिधी पाठविणे, त्यांची वर्गणी देणे, शिष्ट मंडळे पाठविणे यासाठी सरकारच्या सार्वजनिक खर्चात वाढ होत आहे.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

4.6 सार्वजनिक कर्ज : अर्थ आणि महत्त्व

PUBLIC DEBT : MEANING AND IMPORTANCE

सार्वजनिक कर्ज - अर्थ (Meaning of Public Debt)

सार्वजनिक कर्ज हे सार्वजनिक आयव्ययाचे एक महत्त्वाचे साधन आहे. सरकारने किंवा सार्वजनिक सत्तेने घेतलेले कर्ज म्हणजे सार्वजनिक कर्ज होय. सरकार म्हणजे केंद्र सरकार, राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी काढलेली कर्जे होय. सरकारला विविध प्रकारची कार्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. या कार्यांची व जबाबदाऱ्यांची पूर्तता करताना मोठ्या प्रमाणावर खर्च करावा लागतो. सरकारच्या खर्चाच्या तुलनेत सरकारचे उत्पन्न कमी पडते. अशा वेळेस सरकार कर्ज उभारते. सरकार देशातील व्यक्ती, बँका, वित्तीय संस्था यांच्याकडून कर्जाची उभारणी करते. सार्वजनिक कर्ज हे प्रामुख्याने रोखे, बंधपत्रे, राजकोषीय हुंड्या, तात्पुरती उचल, बाजार कर्ज इत्यादी मार्गाने उभारले जाते. स्थूल देशांतर्गत उत्पादनात सार्वजनिक कर्जाचा वाटा किती आहे किंवा स्थूल देशांतर्गत उत्पादनाच्या टक्केवारीच्या रूपात सार्वजनिक कर्ज सामान्यतः सरकारच्या भावी जबाबदाऱ्या पूर्ण करण्याच्या क्षमतेचे सूचक म्हणून वापरले जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांचा सार्वजनिक कर्ज घेण्याला विरोध होता. नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी सार्वजनिक कर्ज घेण्याची आवश्यकता नाही असे स्पष्ट केले

होते. आधुनिक अर्थशास्त्रज्ञ सार्वजनिक कर्जाला विकासाचे साधन मानतात त्याचप्रमाणे सरकारच्या उत्पन्नाचा स्रोत मानतात.

सार्वजनिक कर्ज व्याख्या (Definitions of Public Debt)

सार्वजनिक कर्जाची सर्वमान्य अशी एक व्याख्या देता येत नाही. सार्वजनिक कर्जाच्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे सांगता येतील :

- **" "राज्य सरकार स्वदेशवासीयांकडून आणि विदेशीवासीयांकडून जे कर्ज उभारते ते कर्ज म्हणजे सार्वजनिक कर्ज होय.' - फिडले सिदास**

- **“सरकारचा सार्वजनिक उत्पन्नापेक्षा सार्वजनिक खर्च जास्त झाल्यानंतर तो खर्च भागविण्यासाठी सरकार जे कर्ज उभारते त्या कर्जाला सार्वजनिक कर्ज असे म्हणतात." "**

- **"सरकारने सार्वजनिक खर्चाकरिता देशातील लोकांकडून आणि विदेशातील लोकांकडून घेतलेले कर्ज म्हणजे सार्वजनिक कर्ज होय.”**

वरील व्याख्यांचा विचार करता जेव्हा सरकारला सार्वजनिक खर्चाची पूर्तता करण्यासाठी उत्पन्न कमी पडते तेव्हा तो खर्च भागविण्यासाठी सरकार देशातील नागरिक, बँका, वित्तीय संस्था आणि परदेशातील सरकार, बँका व वित्तीय संस्थांकडून जे कर्ज घेते त्या कर्जाला सार्वजनिक कर्ज असे म्हणतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सार्वजनिक कर्जाची वैशिष्ट्ये :

सार्वजनिक कर्जाच्या वरील व्याख्यांवरून सार्वजनिक कर्जाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील :

(1) सार्वजनिक कर्जाची उभारणी सरकार करते. सरकार या संज्ञेत केंद्र सरकार, राज्य सरकार आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचा समावेश होतो.

(2) सार्वजनिक कर्जाची उभारणी देशातील नागरिक, बँका, वित्तीय संस्था तसेच परदेशातील सरकार, बँका, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याकडून केली जाते.

(3) सार्वजनिक कर्ज हे बाजार कर्ज, कर्जरोखे, राजकोषीय हुंड्या, तात्पुरती उचल, अल्प बचती, भविष्यनिर्वाह निधीतील रकमा, राखीव निधी आणि ठेवी इत्यादी मार्गांनी उभारले जाते. भारतात दीर्घ मुदती व्याजदर रोखे, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, ग्रामीण विकास रोखे, भांडवल विकास रोखे इत्यादी मार्गाने सरकार कर्ज उभारते.

(4) सरकार आपली आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक कर्ज घेते.

(5) (6)विकास कार्यासाठी सार्वजनिक कर्ज घेतले जाते. सार्वजनिक कर्जाचा वापर विकास कामासाठी आणि रचनात्मक कार्यासाठी केल्यास चांगले परिणाम दिसून येतात. मात्र अनुत्पादक कार्यासाठी वापर केल्यास वाईट परिणाम दिसून येतात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(7) सार्वजनिक कर्जावर व्याज द्यावे लागते.

(8) सार्वजनिक कर्जाची परतफेड करावी लागते.

सार्वजनिक कर्जाचे महत्त्व (Importance of Public Debt)

जगातील प्रत्येक देश सार्वजनिक कर्जाचा आधार घेते. सार्वजनिक कर्ज घेण्यामागचे उद्देश भिन्न-भिन्न असले तरी सार्वजनिक कर्ज विविध गरजांच्या पूर्ततेसाठी महत्त्वाचे असते. पुढील मुद्द्यांच्या आधारे सार्वजनिक कर्जाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

1. अंदाजपत्रकातील तूट भरून काढणे (To Meet Budget Deficit) : जेव्हा कर उत्पन्नाच्या तुलनेत सार्वजनिक खर्च सरकारचा जास्त होतो तेव्हा सरकार करवाढीच्या माध्यमातून उत्पन्न वाढविण्यास अनुकूल नसते. करवाढीमुळे जनता नाराज होते. जनतेचा सरकारवरील रोष वाढतो. सरकारविरुद्ध जनमत तयार होते. म्हणून सरकार करवाढ करण्याऐवजी सार्वजनिक कर्ज उभारण्याचा मार्ग निवडते. जर अंदाजपत्रकातील तूट प्रासंगिक असेल तर सरकार ही तूट भरून काढण्यासाठी कर्ज उभारते. परंतु जर दरवर्षी सरकारच्या अंदाजपत्रकात तूट येत असेल तर मात्र सरकार कराच्या मार्गाने उत्पन्न वाढवून अथवा सार्वजनिक खर्चात कपात करून अंदाजपत्रकातील तूट भरून काढते.

2. आर्थिक संकट अथवा आणीबाणीवर मात करणे (To Meet Emergencies) : जेव्हा देशामध्ये आर्थिक संकट येते किंवा आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होते तेव्हा सरकार

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

कर्ज उभारते. प्रामुख्याने युद्धाचा खर्च भागविण्यासाठी कर्ज उभारले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील बहुतेक देशांनी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी आणि युद्धात झालेली हानी भरून काढण्यासाठी सार्वजनिक कर्ज उभारलेले आढळून येते. भारतानेसुद्धा स्वातंत्र्योत्तर काळात चीन आणि पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धकाळानंतर सन 1962, 1965 आणि 1971 नंतर सार्वजनिक कर्ज उभारले.

भारतात 1958 साली अन्नधान्याच्या तुटवड्यावर मात करण्यासाठी अमेरिकेकडून भारताने सार्वजनिक कर्ज उभारले होते. दुष्काळ, भूकंप, महापूर, चक्रीवादळ या नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी सरकार सार्वजनिक कर्ज उभारते.

3. विकास प्रक्रियेला चालना देणे (Incentive for Development Purposes) : ब्रिटिश राजवटीत रेल्वे, जलसिंचन प्रकल्प, वीजनिर्मिती इत्यादींसाठी सार्वजनिक कर्ज उभारण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक नियोजनाचा अवलंब केल्यानंतर भारत सरकारने विकास कार्याचा खर्च भागविण्यासाठी आणि विविध प्रकल्पांची उभारणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज उभारले.

4. चलनवाढीचे नियंत्रण (Control of Inflation) : तेजीच्या काळात देशातील पैशाच्या पुरवठ्यात सातत्याने वाढ होऊन किंमतपातळी वाढत जाते. वाढत्या किमतीमुळे सर्वसामान्य जनतेचे अंदाजपत्रक कोलमडते. त्यांच्या खरेदीशक्तीत घट होऊन राहणीमानाचा दर्जा खालावतो. तेजीच्या काळात सार्वजनिक कर्ज उभारल्यामुळे चलनातील पैशाचा पुरवठा कमी होऊन समाजाच्या उपभोगाच्या आणि मागणीच्या

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

पातळीत घट होऊन वाढणाऱ्या किंमतपातळीवर नियंत्रण ठेवता येते. भाववाढ आटोक्यात येते.

5. मंदीचे नियंत्रण (Control of Deflation) : मंदीच्या काळात राष्ट्रीय उत्पादन, उत्पन्न व रोजगार यामध्ये मोठ्या प्रमाणात घट होते. आर्थिक व्यवहाराच्या पातळीत घट होते. आर्थिक वृद्धिदराची पातळी वेगाने घटते. आर्थिक मंदीच्या काळात सरकार अंतर्गत कर्जापेक्षा परकीय कर्जाची मोठ्या प्रमाणात उभारणी करते. त्या कर्जाचा विनियोग रेल्वे, धरणे, पाटबंधारे, रस्ते बांधणे, नवीन कारखान्यांची उभारणी करणे इत्यादींसाठी केला जातो. त्यामुळे देशात उद्योगाची स्थापना होऊन उत्पादन व रोजगारवाढीला चालना मिळते. लोकांच्या उत्पन्नपातळीत वाढ झाल्यामुळे त्यांच्या खरेदीशक्तीत वाढ होते. उपभोगाच्या आणि मागणीच्या पातळीत वाढ होते. परिणामी, राष्ट्रीय उत्पादन आणि उत्पन्नात वाढ होते. मंदीची तीव्रता कमी होऊन अर्थव्यवस्थेत चैतन्य निर्माण होते.

6. रोजगारनिर्मितीला चालना (Incentive for Employment Creation) : स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने सार्वजनिक कर्जाची उभारणी करून देशात पायाभूत सुविधांचा विकास केला. उदाहरणार्थ, रेल्वे, धरणे, पाटबंधारे, वाहतूक व दळणवळण, शाळा, दवाखाने इत्यादी. यामुळे देशातील तरुणवर्गाला मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण झाला. सरकारने सार्वजनिक कर्जाच्या माध्यमातून सार्वजनिक क्षेत्रात पायाभूत व अवजड उद्योगाची स्थापना केली. उदाहरणार्थ, लोखंड व पोलाद उद्योग, विद्युत उपकरणे निर्मिती उद्योग, धातू उद्योग, औषधेनिर्मिती उद्योग इत्यादींमुळे सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झाल्यास संघटित क्षेत्रातील रोजगार संधीत प्रचंड वाढ झाली.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

7. खाजगी क्षेत्राच्या विकासाला चालना (Incentive for Private Sector Development) : सार्वजनिक कर्जाचा परिणाम देशाच्या आर्थिक विकासावर आणि रोजगार पातळीवर होतो. त्याचा अनुकूल परिणाम खाजगी क्षेत्रावर होतो. खाजगी क्षेत्राच्या विकासाला आणि विस्ताराला चालना मिळते. सरकार जेव्हा सार्वजनिक कर्जाच्या मार्गाने उभारलेली रक्कम देशात खर्च करते तेव्हा देशातील लोकांना रोजगार प्राप्त होऊन त्यांच्या उत्पन्नपातळीत वाढ होते. जनतेच्या खरेदीशक्तीत वाढ होते. मागणीची पातळी वाढल्याने किंमतपातळीत वाढ होते. नफ्याचे प्रमाण वाढण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे खाजगी क्षेत्रात नवीन उद्योगधंदे स्थापन होतात. जुन्या उद्योगधंद्याचा विस्तार होतो.आधुनिकीकरणाला चालना मिळते. त्यामुळे खाजगी क्षेत्राच्या विकासावर अनुकूल व सकारात्मक परिणाम होतो.

8. उत्पन्न वाटणीतील विषमतेत घट (Reduction in Inequality of Income Distribution) : जेव्हा सरकार श्रीमंत व्यक्तीकडून कर्ज घेते आणि त्या कर्जाऊ रकमेचा विनियोग गरीब वर्गाच्या कल्याणासाठी करते तेव्हा श्रीमंत वर्गाकडून गरीब वर्गाकडे खरेदीशक्तीचे हस्तांतरण होते आणि उत्पन्न वाटणीतील विषमता कमी होण्यास मदत होते. संपत्तीचे पुनर्वितरण घडून येते. सरकारने सार्वजनिक कर्जाचा वापर उत्पादक, विकासात्मक, रचनात्मक, विधायक आणि दारिद्र्यनिर्मूलन यासाठी केल्यास उत्पन्न वाटणीत सुधारणा होते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

9. काम, बचत व गुंतवणूक (Work, Saving and Investment) : सार्वजनिक कर्जाचे काम, बचत व गुंतवणूक यावरील परिणाम विचारात घेता जर सरकारने सार्वजनिक कर्जाची रक्कम उत्पादक कामावर खर्च केली तर त्याचे कामगाराच्या कार्यक्षमतेवर बचत आणि गुंतवणूक करण्याच्या क्षमतेवर चांगले परिणाम होतात. अल्प उत्पन्न गटातील लोकांची कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्पादनवाढीला चालना मिळते.

जेव्हा सरकार कर्जरोख्यांची विक्री करून सार्वजनिक कर्ज उभारते तेव्हा लोकांच्या काम, बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर अनुकूल परिणाम होतात. लोकांच्या दृष्टीने सरकारी कर्जरोख्यातील गुंतवणूक सुरक्षित असते. त्यामुळे लोकांच्या बचत आणि गुंतवणूक करण्याच्या इच्छेवर अनुकूल परिणाम होतो.

10. आर्थिक विकास : भारतासारख्या विकसनशील देशात भांडवलाचा तुटवडा आहे. सरकारला आर्थिक विकासाचे कार्यक्रम राबविण्यासाठी कराच्या मार्गाने मिळणारे उत्पन्न अपुरे पडते. या परिस्थितीत सरकार सार्वजनिक कर्जाच्या साहाय्याने आर्थिक विकासासाठी लागणारे भांडवल उभारते. सरकार सार्वजनिक कर्जाच्या मार्गाने उभारलेल्या निधीचा वापर रेल्वे, धरणे बांधणे, विद्युतनिर्मिती या कारणांसाठी करते. त्यामुळे देशात आर्थिक विकासाला पोषक वातावरण निर्माण होते. पायाभूत सुविधा विकासामुळे खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढून आर्थिक विकासाचा वेग वाढतो.सार्वजनिक कर्जाच्या माध्यमातून जनतेच्या कल्याणाच्या विविध योजना राबविल्या

जातात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

4.7 अंदाजपत्रक : अर्थ आणि प्रकार

BUDGET : MEANING AND TYPES

अंदाजपत्रक/अर्थसंकल्प - अर्थ (Meaning of Budget)

सार्वजनिक आयव्ययामध्ये वापरली जाणारी अंदाजपत्रक ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी देशाचे अर्थमंत्री लोकसभेत अंदाजपत्रक मांडतात.

अंदाजपत्रकाला इंग्रजीत 'Budget' (बजेट) असे म्हणतात. Budget हा शब्द Bowgettee इंग्रजी शब्दापासून तयार झाला. Bowgettee हा शब्द Bougette या मूळ फ्रेंच शब्दापासून निर्माण झाला. Bougette हा शब्द Bouge या शब्दापासून निर्माण झालेला आहे. Bouge म्हणजे चामड्याची एक थैली किंवा पिशवी होय. सन 1733 मध्य आर्थिक वर्षाच्या काळातील आयव्ययाबाबतची सरकारची योजना या अर्थाने हा शब्द वापरण्यात आला. कायदेमंडळाच्या विचारासाठी मांडावयाच्या आयव्ययाबाबतच्या योजना किंवा वित्तीय योजनेबाबतचे कागदपत्र ज्या बॅगेत किंवा पिशवीत ठेवलेले असतात त्या पिशवीला 'बजेट' असे म्हणतात. या पिशवीतून कायदेमंडळापुढे मांडण्यासाठी कागद काढले जातात त्या कृतीला Opening the Budget असे नाव देण्यात आले आणि अंदाजपत्रकाला बजेट म्हणण्याची प्रथा पडली. सन 1803 मध्ये फ्रान्समध्ये अंदाजपत्रक (Budget) या शब्दाचा प्रथम प्रयोग करण्यात आला. त्यानंतर वेगवेगळ्या देशांनी या शब्दाचा वापर सुरू केला.

HRMBUS.ECONOMICS SYBCOM

साध्या शब्दात, अंदाजपत्रक म्हणजे निश्चित कालावधीसाठी सरकारचे उत्पन्न आणि खर्चाविषयी करण्यात आलेले अंदाज होय. पुढील वर्षाच्या काळातील सरकारच्या उत्पन्नाविषयी आणि खर्चाविषयी माहिती देणारे विवरणपत्रक म्हणजे अर्थसंकल्प होय. अर्थसंकल्पात पुढील आगामी वर्षात सरकार कोणकोणत्या बाबींवर अथवा क्षेत्रांवर खर्च करणार आणि हा खर्च भागविण्यासाठी पुढील वित्तीय वर्षात कोणकोणत्या मार्गाने उत्पन्न उभारणार या विषयीचा तपशील संसदेत सादर केला जातो. सन 2016 पूर्वी भारतात रेल्वे अर्थसंकल्प स्वतंत्र सादर केला जात होता. सन 2016 मध्ये अर्थमंत्री कै. अरुण जेटली यांनी रेल्वेचे अंदाजपत्रक केंद्रीय अर्थसंकल्पात समाविष्ट केले आणि ते एकाच दिवशी सादर केले. भारतात केंद्रीय अर्थसंकल्प देशाचे अर्थमंत्री राष्ट्रपतींच्या वतीने लोकसभेत सादर करतात. साधारणतः फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अर्थसंकल्प सादर करण्याची प्रथा आहे. भारतात राज्यांच्या पातळीवर राज्यांचे अर्थमंत्री विधानसभेत अर्थसंकल्प सादर करतात.

अर्थसंकल्पात सरकारच्या गतवर्षीच्या जमा-खर्चाची सुधारित आकडेवारी असते. चालू वित्त वर्ष संपत असतानाचे सुधारित अंदाज असतात. नव्या आगामी वित्त वर्षातील जमा-खर्चाचे प्रस्तावित अंदाज असतात. स्वतंत्र भारताचा पहिला अर्थसंकल्प पहिले अर्थमंत्री षणमुखम शेट्टी यांनी मांडला.

सरकारचे अंदाजपत्रक म्हणजे सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी, सार्वजनिक खर्चाच्या बाबी, सार्वजनिक कर्जाची व्यवस्था व परतफेड, तूट इत्यादींच्या संदर्भात आर्थिक वर्षाच्या

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

सुरुवातीला तयार केलेले विवरणपत्रक असते. सर्वसाधारणपणे 1 एप्रिल ते 31 मार्च या पुढील आर्थिक वर्षातील सरकारच्या उत्पन्न आणि खर्चाबाबतचे विवरण करणारी प्रशासकीय कागदपत्रे म्हणजे अंदाजपत्रक होय.

अंदाजपत्रक - व्याख्या (Definitions of Budget)

- **'अर्थसंकल्प म्हणजे आगामी आर्थिक वर्षासाठी अपेक्षित उत्पन्न व नियोजित खर्च यांचा सरकारने अर्थमंत्र्यांनी मांडलेला हिशेब होय."**

- **सर्वसाधारण व्याख्या**

  एल. किंग "सरकारच्या महसुलाचा आणि खर्चाचा आगामी वर्षातील अंदाज म्हणजे अंदाजपत्रक होय." - प्रा. जे. एल. हॅन्सन "सार्वजनिक उत्पन्न आणि सार्वजनिक खर्च यामध्ये ज्या साधनाने समतोल प्रस्थापित केला जातो ते साधन म्हणजे अर्थसंकल्प होय." –

- **“विशिष्ट वर्षासाठी असलेल्या नियोजित उत्पन्न आणि खर्चाची तपशीलवार माहिती ज्यामध्ये असते त्यास अर्थसंकल्प असे म्हणतात."**

- प्रा. **सॅम्युअलसन "अंदाजपत्रक हे आय आणि व्ययाचे वार्षिक विवरण आहे की, जे सार्वजनिक अधिकाऱ्याद्वारा अनुमानित व्यय पूर्ण करण्याच्या हेतूने तयार करण्यात येते. ज्यामध्ये सामान्यतः दोन वित्तीय कालावधी समाविष्ट असतात.**

HRMBUS.ECONOMICS SYBCOM

अंदाजपत्रकाची वैशिष्ट्ये :

अंदाजपत्रकाच्या वरील व्याख्यांवरून अंदाजपत्रकाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील

(1) अंदाजपत्रक हे एक वित्तीय विवरण असते.

(2) अंदाजपत्रकात पुढील वर्षाच्या काळातील सरकारच्या अपेक्षित उत्पन्नाची आणि नियोजित खर्चाची माहिती असते.

(3) अंदाजपत्रकाचा कालावधी सामान्यतः एक वर्षाचा असतो.

(4) भारतात 1 एप्रिल ते 31 मार्च आर्थिक वर्ष विचारात घेऊन अंदाजपत्रक मांडले जाते.

(5) अर्थसंकल्प व्यापक स्वरूपाचा असतो. अर्थसंकल्पामध्ये सरकारच्या सर्व विभागांच्या उत्पन्न आणि खर्चाची माहिती असते.

(6) अंदाजपत्रकात चालू वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे अंदाजित आकडे, मागील वर्षाच्या उत्पन्नाचे आणि खर्चाचे सुधारित आकडे आणि त्यापूर्वीच्या वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचे प्रत्यक्षातील आकडे मांडले जातात.

(7) काही अचानक घटना घडल्यास पूर्वीच्या अर्थसंकल्पात फेरफार केले जातात. परिस्थितीतील बदलानुसार सुधारणा केल्या जातात.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(8) अंदाजपत्रकातून सरकारची आर्थिक धोरणे स्पष्ट होतात.

अंदाजपत्रक/अर्थसंकल्पाचे प्रकार (Types of Budget)

(1) संतुलित अर्थसंकल्प, शिलकी अर्थसंकल्प आणि तुटीचा अर्थसंकल्प

(2) महसुली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक

(3) मुख्य अर्थसंकल्प आणि पूरक अर्थसंकल्प

(4) योजना आणि योजनेतर अर्थसंकल्प

(5) अंतरिम अर्थसंकल्प.

1. संतुलित अर्थसंकल्प, शिलकी अर्थसंकल्प आणि तुटीचा अर्थसंकल्प : * संतुलित/समतोल अर्थसंकल्प (Balance Budget) :

"जेव्हा अर्थसंकल्पात सरकारचे पुढील वर्षातील अपेक्षित उत्पन्न व नियोजित खर्च या बाजू समान दर्शविल्या जातात तेव्हा त्याला संतुलित अर्थसंकल्प असे म्हणतात."

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

डॉ. डाल्टन यांच्या मते, "सार्वजनिक खर्च सार्वजनिक उत्पन्नापेक्षा कमी किंवा अधिक नसेल तर ते अंदाजपत्रक समतोल मानले जाते."

ॲडम स्मिथ व इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी संतुलित अर्थसंकल्पाचा पुरस्कार केला. जेव्हा अर्थव्यवस्थेत बचत आणि गुंतवणूक, मागणी व पुरवठा समान असतात; किंमतपातळी स्थिर असते तेव्हा संतुलित अर्थसंकल्प फायदेशीर ठरतो.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी निर्हस्तक्षेप नीतीचा पुरस्कार केलेला होता. त्यांच्या मते, आर्थिक व्यवहारात सरकारचा हस्तक्षेप कमीतकमी असला पाहिजे. कमीतकमी कर बसविणारे व कमीतकमी खर्च करणारे सरकार हे सर्वोत्तम सरकार असते. जर सरकारने गोळा केलेल्या कर उत्पन्नापेक्षा जास्त खर्च केल्यास लोकांच्या खरेदीशक्तीत वाढ होऊन वस्तू व सेवांची मागणी वाढते. त्यामुळे देशातील किंमतपातळीत वाढ होते. देशात भाववाढीचा प्रश्न निर्माण होतो. याउलट, जर सरकारने कर उत्पन्नाच्या तुलनेत सार्वजनिक खर्च कमी केला तर देशातील लोकांची खरेदीशक्ती कमी होते. वस्तू व सेवांच्या मागणीत घट होऊन किंमतपातळीत घट होते व देशात चलनसंकोचाची समस्या निर्माण होते.

संतुलित अर्थसंकल्पाचे फायदे :

(1) संतुलित अर्थसंकल्पामुळे सरकारी खर्चाच्या अनावश्यक उधळपट्टीला आळा बसतो.

HRM BUS ECONOMICS SYBCOM

(2) संतुलित अर्थसंकल्पामुळे खाजगी क्षेत्रातील साधनसामग्रीचा व बचतीचा कार्यक्षम वापर होतो.

(3) संतुलित अर्थसंकल्पामुळे भाववाढीला चालना मिळत नाही.

(4) संतुलित अर्थसंकल्पाचे धोरण निर्हस्तक्षेप नीतीशी सुसंगत आहे.

(5) संतुलित अंदाजपत्रकामुळे सरकारवर कर्जाचा बोजा वाढत नाही.

संतुलित अर्थसंकल्पाचे तोटे :

आधुनिक दृष्टिकोनानुसार संतुलित अर्थसंकल्पाची संकल्पना निरुपयोगी व कालबाह्य ठरलेली आहे.

(1) संतुलित अर्थसंकल्पाच्या संकल्पनेत खाजगी आयव्ययाची तत्त्वे, व्याप्ती आणि उद्दिष्टे सार्वजनिक आयव्ययाला जशीच्या तशी लागू केलेली आहेत.

(2) संतुलित अर्थसंकल्पाचे धोरण सरकारचा निर्हस्तक्षेप, पूर्ण रोजगार या अवास्तव गृहीतांवर आधारित आहे.

(3) तेजी व मंदीच्या काळात संतुलित अर्थसंकल्पामुळे परिस्थिती आटोक्यात येत नाही.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

शिलकी किंवा आधिक्याचा अर्थसंकल्प (Surplus Budget) :

व्याख्या : "ज्या अर्थसंकल्पात सरकारचे एकूण अपेक्षित उत्पन्न जास्त व एकूण नियोजित खर्च कमी असतो त्याला शिलकी अर्थसंकल्प असे म्हणतात.

थोडक्यात, अर्थसंकल्पात जेव्हा खर्चाच्या बाजूपेक्षा जमेची बाजू अधिक दर्शविली जाते तेव्हा तो अर्थसंकल्प शिलकीचा अर्थसंकल्प असतो. शिलकीच्या अंदाजपत्रकाचे समर्थन सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी केलेले आहे.

शिलकी अंदाजपत्रकाचे फायदे :

(1) शिलकी अर्थसंकल्पामुळे अर्थव्यवस्थेतील तेजी नियंत्रित करता येते. कररूपाने सरकार लोकांच्या हातातील अतिरिक्त क्रयशक्ती काढून घेते आणि सरकारी खर्चात कपात करून मागणीची पातळी कमी करून वाढत्या किमती नियंत्रित करते.

(2) शिलकी अर्थसंकल्पामुळे सरकारी खर्च मर्यादित राहतो व सरकारकडून केल्या जाणाऱ्या अनावश्यक खर्चाला आळा बसतो.

(3) शिलकी अर्थसंकल्पामुळे सरकारला सार्वजनिक खर्च भागविण्यासाठी कर्ज काढावे लागत नाही. सरकारला अंतर्गत व बाह्य कर्जाचा भार सोसावा लागत नाही.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(4) शिलकी अर्थसंकल्पामुळे सरकारचे दायित्व घटून सरकारच्या राखीव निधीत वाढ होते.

शिलकी अंदाजपत्रकाचे तोटे :

(1) शिलकी अर्थसंकल्पामुळे आर्थिक व्यवहारांचा संकोच होतो. लोकांच्या हातातील पैसा कररूपाने काढून घेतल्याने क्रयशक्तीत घट होते.

(2) मंदीच्या काळात शिलकी अर्थसंकल्प सादर केल्यास अर्थव्यवस्थेतील मंदीची तीव्रता आणखी वाढते.

(3) शिलकी अर्थसंकल्पामुळे समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणावर केल्या जाणाऱ्या खर्चात घट होते.

(4) आर्थिक विकासाच्या वाढत्या गरजा भागविण्यासाठी सरकारला पायाभूत सुविधा, औद्योगिक प्रकल्प उभारणीसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. या परिस्थितीत शिलकी अर्थसंकल्पाचा स्वीकार करणे अयोग्य ठरते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

तुटीचा अर्थसंकल्प (Deficit Budget):

- **व्याख्या : "ज्या अर्थसंकल्पात पुढील वर्षातील अपेक्षित उत्पन्न हे अपेक्षित खर्चापेक्षा कमी असते अशा अर्थसंकल्पाला तुटीचा अर्थसंकल्प असे म्हणतात."**

- **"जेव्हा अर्थसंकल्पात खर्चाची बाजू जमेच्या बाजूपेक्षा जास्त असते तेव्हा त्या अर्थसंकल्पाला तुटीचा अर्थसंकल्प असे म्हणतात.**

तुटीचा अर्थसंकल्प दोन प्रकारे सादर केला जातो :

(1) कर उत्पन्नात बदल न करता सरकारी खर्चात वाढ करून.

(2) सरकारी खर्चात बदल न करता कराच्या दरात घट करून.

तुटीच्या अर्थसंकल्पाचे फायदे :

(1) मंदीच्या काळात जनतेच्या क्रयशक्तीत व परिणामकारक मागणीत वाढ करण्यासाठी सरकारी खर्चात वाढ करून मंदीचे प्रभावीपणे नियंत्रण तुटीच्या अंदाजपत्रकाद्वारे करता येते.

(2) विकसनशील देशांना आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सेवा, मूलभूत व अवजड उद्योगाची स्थापना, विकास प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी तुटीचा अर्थसंकल्प उपयुक्त ठरतो. .

(3) विकसनशील देशांमध्ये कराच्या मार्गाने मोठ्या प्रमाणावर उत्पन्न गोळा करणे शक्य नसते. म्हणून सरकार देशातील गरीब लोकांच्या कल्याणासाठी ज्या विविध योजना राबविते त्या योजनांच्या खर्चपूर्तीसाठी सरकारी खर्चात वाढ केली जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(3) तुटीच्या अर्थसंकल्पामुळे आर्थिक व्यवहारांची पातळी उंचावण्यास मदत होते. जनतेच्या हातात जास्त पैसा येतो. त्यामुळे उपभोग्य वस्तू व सेवांची मागणी वाढून उत्पादन व रोजगारवाढीला चालना मिळते.

तुटीच्या अर्थसंकल्पाचे तोटे :

(1) तेजीच्या काळात तुटीच्या अर्थसंकल्पामुळे किंमतवाढीला चालना मिळून तेजीची तीव्रता वाढते.

2) तुटीच्या अर्थसंकल्पामुळे सरकारच्या दायित्वात वाढ होते

3) तुटीच्या अर्थसंकल्पामुळे सरकारच्या संचित निधीतील राखीव रकमेत घट होते.

(4) तुटीच्या अर्थसंकल्पामुळे सरकारच्या अनुत्पादक खर्चात वाढ होते. त्यामुळे देशात भाववाढीचा धोका निर्माण होतो.

अर्थसंकल्प शिलकीचा आणि तुटीचा अर्थसंकल्प हे दोन्ही प्रकारचे अर्थसंकल्प असंतुलित अर्थसंकल्प आहेत.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

2. महसुली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक :

(Revenue Budget and Capital Budget)

*** महसुली अंदाजपत्रक (Revenue Budget) :**

"खर्च किंवा दैनंदिन खर्च आणि चालू जमा किंवा चालू महसूल यांचा अंतर्भाव असणारे अंदाजपत्रक म्हणजे महसुली अंदाजपत्रक होय."

चालू खर्च म्हणजे ज्या खर्चामुळे सामुदायिक उपभोगाच्या वस्तू व सेवांची निर्मिती अथवा खरेदी कली जाते. महसुली अंदाजपत्रकात एका आर्थिक वर्षामध्ये सरकार जनतेच्या कल्याणासाठी कोणकोणत्या बाबींवर खर्च करणार आणि हा खर्च भागविण्यासाठी सरकार जनतेकडून कर व करेतर मार्गाने किती बोजा टाकणार हे समजते. महसुली अंदाजपत्रकावरून सरकार देशातील जनतेच्या हिताला किती महत्त्व देते हे समजते. महसुली अंदाजपत्रक तयार करताना प्रथम खर्च निश्चित केला जातो आणि त्या खर्चाच्या पूर्तीसाठी खर्चाच्या रकमेएवढे कर आणि करेतर उत्पन्न जमा केले जाते.

महसुली अंदाजपत्रकात सरकार पुढील मार्गाने महसूल जमा करते :

(1) कर : सरकार देशातील नागरिक व संस्थाकडून वेगवेगळ्या कराच्या मार्गाने उत्पन्न गोळा करते. उदाहरणार्थ, प्राप्ती कर, कंपनी (निगम) कर, उत्पादन कर, आयात-निर्यात कर, भांडवली नफ्यावरील कर, संपत्ती कर, देणगी कर, वारसा हक्क कर.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(2) करेतर उत्पन्न : सरकार लोकांसाठी विविध प्रकारची कामे करते. त्यासाठी विविध प्रकारचे शुल्क आकारले जाते. मुद्रांक शुल्क, परवाना शुल्क, जागा व जमिनीचे नकाशे मिळविण्यासाठीचे शुल्क इत्यादी.

(3) सरकारी मालकीच्या उद्योगापासून मिळणारे उत्पन्न : देशात सरकारने विविध प्रकारचे उद्योग सुरू केलेले आहेत. त्या उद्योगांना मिळणारा नफा, मध्यवर्ती बँकेचा नफ्यातील मिळणारा भाग.

(4) सरकारी मालमत्तेपासून मिळणारे उत्पन्न : सरकारच्या मालकीच्या जमिनी, इमारती इत्यादीपासून मिळणारे उत्पन्न.

(5) लाभांश व व्याज : सरकारी कंपन्यांमधील भागांवरील लाभांश, सरकारने दिलेल्या कर्जावरील व्याजरूपाने प्राप्त होणारे उत्पन्न.

वरील पाच मार्गाने सरकारला मिळालेले उत्पन्न अंदाजपत्रकात जमा बाजूला दर्शविले जाते.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

महसुली खर्च (Revenue Expenditure) :

महसुली अंदाजपत्रकात खर्च बाजूला संरक्षणावरील खर्च, नागरी प्रशासन खर्च, न्यायव्यवस्थेवरील खर्च, कर वसुलीचा खर्च, सामाजिक सुरक्षिततेसाठी केला जाणारा खर्च,

नागरिकांच्या कल्याणविषयक कार्यक्रमावरील खर्च (उदा., शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, कुटुंबकल्याण, महिला व बाल विकास, पर्यावरण रक्षण, शेती, जलसिंचन, वाहतूक आणि दळणवळण, ग्रामीण विकास) इत्यादी कामांवर होणारा खर्चाचा समावेश होतो.

- **महसुली अंदाजपत्रकात कर उत्पन्नाला महत्त्वाचे स्थान असते. म्हणून महसुली अंदाजपत्रकाला 'कर वित्तीय अंदाजपत्रक' (Tax Financial Budget) असे म्हणतात.**

महसुली अंदाजपत्रकात सरकारने दैनंदिन खर्च भागविण्याएवढे उत्पन्न मिळविले पाहिजे. महसुली अंदाजपत्रकात तूट नसावी. महसुली जमा ही महसुली खर्चापेक्षा जास्त असेल तर ती चांगली बाब समजली जाते.

* भांडवली अंदाजपत्रक (Capital Budget)

- **"ज्या अंदाजपत्रकात भांडवली उत्पन्न आणि भांडवली खर्चाचा समावेश केला जातो त्या अंदाजपत्रकाला भांडवली अंदाजपत्रक असे म्हणतात."**

भांडवली खर्च म्हणजे ज्या खर्चामुळे देशाच्या उत्पादक साधनात किंवा मालमत्तेत भर पडते असा खर्च होय. या खर्चाची पूर्तता करण्यासाठी सरकार विविध मार्गाने उत्पन्न मिळविते. या उत्पन्नाचा समावेश भांडवली अंदाजपत्रकात जमा बाजूला दर्शविला जातो. भांडवली

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

अंदाजपत्रकात उत्पन्नाच्या बाजूने कर्जे (अंतर्गत व परकीय), घसारा, शिल्लक इत्यादींचा समावेश होतो.

उत्पन्नाच्या बाबी:

(1) देशांतर्गत व विदेशात उभारलेली नवीन कर्जे.

(2) सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांची भविष्यनिर्वाह निधीची रक्कम. (होणारी रक्कम.

3) पोस्टातील विविध बचत योजनांमध्ये जमा

(4) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय विकास संस्थांकडून घेतलेली कर्जे.

(5) देशाबाहेरून मिळणारी अनुदाने आणि आर्थिक साहाय्य.

(6) निर्गुंतवणुकीपासून मिळणारे उत्पन्न.

(7) महसुली अंदाजपत्रकातील घसारा निधी.

(8) महसुली अंदाजपत्रकातील शिल्लक रक्कम.

(9) सरकारच्या कर्जाची परतफेड.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

वरील सर्व मार्गांनी मिळणारे उत्पन्न भांडवली अंदाजपत्रकात जमा बाजूला दर्शविले जाते.

भांडवली खर्च (Capital Expenditure) :

भांडवली खर्चामुळे सरकारच्या मालमत्तेत भर पडते आणि उत्पादनात वाढ होते. भांडवली अंदाजपत्रकात सरकारच्या खर्चाचे उत्पादक उत्पादक गुंतवणूक खर्च आणि अनुत्पादक गुंतवणूक खर्च असे विभाजन केले जाते. भांडवली अंदाजपत्रकात खर्चाच्या बाजूला सरकारची भांडवल गुंतवणूक व सरकारची कर्जे यांचा समावेश होतो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

(1) खर्चाच्या बाबी:

भांडवल गुंतवणुकीवरील खर्च ज्या भांडवल गुंतवणूक खर्चामुळे नव्या भांडवली स्वरूपात उत्पादन साधनांची निर्मिती होते त्या भांडवली खर्चाला 'उत्पादक गुंतवणूक खर्च' असे म्हणतात. उदाहरणार्थ, नवीन रेल्वेमार्ग, नवीन बंदरे, नवीन विद्युत प्रकल्प, नवीन दळणवळण साधने.

सरकारला ज्या भांडवल गुंतवणूक खर्चापासून भविष्यकाळात उत्पन्न मिळण्याची शक्यता नसते त्या खर्चाला 'अनुत्पादक भांडवली खर्च' असे म्हणतात. उदा., संरक्षणावरील खर्च.

(2) सरकारने दिलेली कर्जे, सरकारने देशातील विविध औद्योगिक प्रकल्पांना दिलेली कर्जे.

(3) परकीय कर्जाची परतफेड - परकीय देश आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाच्या मुद्दलाची व व्याजाची परतफेड करण्यासाठी केलेला खर्च.

(4) घटकराज्यांना दिलेली कर्जे व अनुदाने सरकार देशातील घटकराज्यांना व विविध संस्थांना कर्जे आणि अनुदाने देते.

(5) भूकंप, अतिवृष्टी, त्सुनामी, चक्रीय वादळे निवारणासाठी दिलेली मदत किंवा केलेला खर्च.

- **भांडवली अंदाजपत्रकात कर्जाला विशेष महत्त्व आहे. म्हणून भांडवली अंदाजपत्रकाला कर्ज 'वित्तीय अंदाजपत्रक' (Loan Financial Budget) असे म्हणतात.**

- **जेव्हा एकूण भांडवली उत्पन्न एकूण भांडवली खर्चापेक्षा जास्त असते तेव्हा त्या भांडवली अंदाजपत्रकाला 'शिलकीचे भांडवली अंदाजपत्रक' असे म्हणतात.**

- **जेव्हा एकूण भांडवली उत्पन्नाच्या तुलनेत एकूण भांडवली खर्च अधिक असतो तेव्हा त्या भांडवली अंदाजपत्रकाला भांडवली तूट किंवा तुटीचे भांडवली अंदाजपत्रक' असे म्हणतात.**

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

संकलित अंदाजपत्रक (Compiled Budget) :

सरकार जेव्हा महसुली अंदाजपत्रक आणि भांडवली अंदाजपत्रक स्वतंत्रपणे न मांडता एकत्रितपणे मांडते तेव्हा त्या अंदाजपत्रकाला 'संकलित अंदाजपत्रक' असे म्हणतात.

सरकारला संकलित अंदाजपत्रकावरून एकूण उत्पन्न आणि एकूण खर्चाचा आढावा घेता येतो. भारतात दरवर्षी महसुली व भांडवली अंदाजपत्रक स्वतंत्रपणे न मांडता एकत्रितपणे मांडले जाते. या अंदाजपत्रकामुळे सरकारच्या ध्येयधोरणाचा चांगल्या प्रकारे आढावा घेता येतो.

3. मुख्य अर्थसंकल्प आणि पूरक अर्थसंकल्प :
(Main Budget and Supplementary Budget)

संपूर्ण वित्तीय किंवा आर्थिक वर्षासाठी मांडला जाणारा अर्थसंकल्प म्हणजे मुख्य अर्थसंकल्प होय. मुख्य अर्थसंकल्प म्हणजे सरकारचे वार्षिक वित्तीय विवरणपत्रक असते. मुख्य अर्थसंकल्पात सरकारची अपेक्षित प्राप्ती आणि नियोजित खर्चाबाबत अंदाज दिलेले असतात. मुख्य अर्थसंकल्प नियमितपणे दरवर्षी सादर केला जातो.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

पूरक अर्थसंकल्प (Supplementary Budget) :

जेव्हा देशात नैसर्गिक आपत्ती व युद्धासारखे प्रसंग निर्माण होतात तेव्हा वाढीव खर्चाच्या पूर्ततेसाठी जे अंदाजपत्रक सादर केले जाते त्या अंदाजपत्रकाला 'पूरक अंदाजपत्रक' असे म्हणतात.

महसुलाच्या नेहमीच्या स्रोताद्वारे उत्पन्न मिळविणे शक्य होत नसल्यामुळे असा खर्च भागविण्यासाठी कर व करेतर महसूल वाढविणे आवश्यक असते. पूरक अर्थसंकल्पाच्या माध्यमातून अचानक उद्भवणाऱ्या खर्चासाठी वित्तीय तरतूद केली जाते. देशात जेव्हा आणीबाणीजन्य परिस्थिती उद्भवते तेव्हा पूरक अर्थसंकल्प मांडला जातो. पूरक अर्थसंकल्प मांडण्याची विशिष्ट वेळ नसते किंवा त्याचा कालावधी निश्चित नसतो. आवश्यकता असेल तेव्हा सरकार पूरक अर्थसंकल्प सादर करते.

4. योजना आणि योजनेतर अर्थसंकल्प (Plan and Non-Plan Budget) : आर्थिक नियोजनाचा पुरस्कार करणाऱ्या देशामध्ये अर्थसंकल्पाची विभागणी योजना अर्थसंकल्प आणि योजनेतर अर्थसंकल्प अशा दोन गटात केली जाते.

योजना अर्थसंकल्प (Plan Budget):

योजना अर्थसंकल्पात चालू पंचवार्षिक योजनेतील विविध क्षेत्रांच्या संदर्भात वित्तीय तरतुदींचा समावेश असतो. उदाहरणार्थ, शेती व शेतीपूरक व्यवसाय, जलसिंचन, विद्युतनिर्मिती, वाहतूक व दळणवळण, ऊर्जा, उद्योग, सामाजिक सेवा इत्यादी.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

योजना अर्थसंकल्पात महसुली व भांडवली खर्चाची तरतूद केलेली असते. पंचवार्षिक योजनाकाळातील केंद्रीय योजनेतील प्रकल्पासाठी वित्तीय तरतूद केली जाते. योजना अर्थसंकल्पामध्ये केंद्र सरकारकडून राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना दिल्या जाणाऱ्या साहाय्यांचा समावेश असतो. योजना अर्थसंकल्पात पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून करावयाचा खर्च समाविष्ट असतो.

योजनेतर अर्थसंकल्प (Non-Plan Budget): *

सरकारच्या योजनाबाह्य खर्चाच्या संदर्भातील वित्तीय तरतुदींचा समावेश असणाऱ्या अर्थसंकल्पाला 'योजनाबाह्य अर्थसंकल्प' असे म्हणतात. उदाहरणार्थ, संरक्षण खर्च, अंतर्गत सुरक्षेसाठी होणारा खर्च, कर्जावरील व्याज, पेन्शन, महागाई भत्ता, महापूर, ओला दुष्काळ इत्यादी.

सरकारला दैनंदिन कार्याची पूर्ती करण्यासाठी विविध विभागांवर खर्च करावा लागतो. अर्थसंकल्पात योजना खर्च हा योजनेतर खर्चापेक्षा अधिक असणे योग्य असते. पूर्वनियोजित व दीर्घकालीन योजनेचा एक टप्पा म्हणून योजना खर्च केल्यास त्याचा लाभ अर्थव्यवस्थेच्या सशक्तीकरणासाठी होतो. सन 2017-18 च्या अर्थसंकल्पामध्ये योजना खर्च आणि योजनेतर खर्च हा भेद नष्ट करण्यात आला.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

5. अंतरिम अर्थसंकल्प (Interim Budget) :

सत्तेवर आलेल्या सरकारची मुदत संपूर्ण आर्थिक वर्षाकरिता असेल तर पूर्ण अर्थसंकल्प सादर केला जातो. परंतु आर्थिक वर्ष सुरू झाल्यानंतर थोड्याच कालावधीत सरकारची मुदत संपत असेल आणि त्यानंतर निवडणुका होऊन नवीन सरकार स्थापन होणार असेल तर अस्तित्वात असलेल्या सरकारला पुढील पूर्ण वर्षाचा अर्थसंकल्प सादर करण्याचा अधिकार नसतो; तसे प्रयोजनही नसते. अशा वेळी अंतरिम अर्थसंकल्प सादरकेला जातो. याशिवाय आर्थिक वर्ष संपता-संपता (उदा., मार्च) जर नवीन सरकार सत्तेवर आले तर अशा प्रसंगी अंतरिम अर्थसंकल्प तयार केला जातो. आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्प मंजूर झालेला असल्यामुळे संपणाऱ्या काही दिवसाचा खर्च करणे सरकारला अडचणीचे नसते. परंतु नवीन वर्षापासून म्हणजेच 1 एप्रिलपासून सरकार संसदेच्या परवानगीशिवाय खर्च करू शकत नाही. मग देशाचा कारभार कसा चालणार हा प्रश्न उपस्थित होतो.

अर्थसंकल्प सादर करणे, त्यावर संसदेत चर्चा करणे यासाठी काही अवधी लागतो. तेवढा अवधी आर्थिक वर्ष संपता-संपता सत्तेवर आलेल्या सरकारकडे नसतो. मग या परिस्थितीत खर्च करण्यासाठी परवानगी घेण्याचा एक मार्ग असतो. तो म्हणजे अंतरिम अर्थसंकल्पच होय. भारतात सन 1991-92, 1996-97, 1998-99, 2004-05 आणि 2013-14 या वर्षी अंतरिम अर्थसंकल्प सादर करण्यात आले.

HRMBUS.ECONOMICSSYBCOM

अंतरिम अर्थसंकल्पाला 'लेखानुदान' असेही म्हणतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम 116 मध्ये तशी तरतूद करण्यात आलेली आहे. काही कारणाने सरकारला अर्थसंकल्प तयार करून सादर करणे आणि त्यासंबंधी कार्यवाही करणे शक्य नसेल तर सरकार आपला खर्च भागविण्यासाठी राष्ट्रीय तिजोरीतून म्हणजेच एकत्रित निधीतून तात्पुरती रक्कम काढण्याचा अधिकार संसदेला देण्यात आला आहे. त्यामुळे अर्थसंकल्पाअभावी सरकारला नव्या आर्थिक वर्षात सुरुवातीच्या दोन-चार महिन्यांसाठी आपल्या कोणत्या खर्चासाठी किती पैसा लागणार आहे याचा अंदाज बांधून एक 'हंगामी अर्थसंकल्प' तयार करता येतो आणि ते लेखानुदान म्हणून लोकसभेपुढे मांडून त्याला मान्यता मिळविता येते.

लेखानुदान म्हणजे काही अंतिम अथवा पूर्ण अर्थसंकल्प नसतो तर ती एक तात्पुरती सोय किंवा व्यवस्था असते. त्यामुळे लेखानुदानाला संसदेची मान्यता मिळणे कठीण नसते.

--------------------------------XXX---

प्रश्न 1.रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय वापरून विधाने पूर्ण करा.

1.सार्वजनिक आयव्ययामध्ये ----------------च्या कार्यव्यवहाराचा अभ्यास केला जातो.
(व्यक्ती / संस्था / सरकार / निगम)

2.सार्वजनिक आयव्ययाच्या व्याप्तीत खालीलपैकी----------------- याचा समावेश .होत नाही.
(कर | सार्वजनिक खर्च / चलनविषयक धोरण | सार्वजनिक कर्ज)

3. कर हे ------------------ देणे असते.
(ऐच्छिक / सक्तीचे / दंडात्मक / बेकायदेशीर)

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

4. प्रतिगामी कराच्या बाबतीत उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर कराच्या दरात-----------
(घट होते / वाढ होते / स्थिरता येते / बदल होत नाही)

5 .भारतात आर्थिक वर्षाची सुरुवात------------- पासून होते.
. (1 जानेवारी / 31 मार्च / 1 एप्रिल / 1 जुलै)

6.----------------गरजांची पूर्तता करण्यासाठी सरकारकडून केला जाणारा खर्च म्हणजे सामाजिक खर्च होय.
(व्यक्तिगत / मानसशास्त्रीय / सुरक्षाविषयक / सामुदायिक)

7. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून घेतलेले कर्ज हे---------
कर्ज आहे. (अंतर्गत / परकीय / सक्तीचे / ऐच्छिक)

8. दीर्घकालीन सार्वजनिक कर्जाचे ओझे पिढीवर----------------असते.
(वर्तमानकालीन / भूतकालीन / भविष्यकालीन)

9.ज्या अर्थसंकल्पात सार्वजनिक खर्च हा सार्वजनिक उत्पन्नापेक्षा जास्त असतो त्या अर्थसंकल्पाला ---------------अर्थसंकल्प असे म्हणतात.
(महसुली / संतुलित / शिलकीचा / तुटीचा)

10. ज्या खर्चामुळे देशाच्या मालमत्तेत भर पडते अशा खर्चाला-----------------
खर्च असे म्हणतात.
(महसुली / भांडवली / विकासेतर / अनुत्पादक)

•

.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM

संदर्भसूची

2.व्यवसायिक अर्थशास्त्र (समग्रलक्षी)पब्लिकेशन प्रा. डॉ.राजेंद्र अ.रसाळ जून 2020.

HRM BUS.ECONOMICS SYBCOM